
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय :
दा. क्र. :

# समर्थ रामदास

पु. पां. गोखले



BVBK-0403538

रजि नं. ८४४०१ बालवाङ्मय.
बा.वा.
३५३८
२६।४।९९

# समर्थ रामदास

म. ग्रं. सं. ठाणे, बालवाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ३५३८ दिनांक २६।४।९९
विषय बा॰वा क्र.........

पु. पां. गोखले

BVBK-0403538

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

Samartha Ramdas
P. P. Gokhale


**प्रकाशक**
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग
२७३, शनिवार पेठ,
पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित

**प्रकाशन दिनांक :**
१५ नोव्हेंबर १९९८
बाबुराव गोखले जन्मशताब्दी

**मुद्रक :**
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे-३०

**किंमत २५/- रुपये**



# १. मुलखावेगळा मुलगा

कोण हो? अहो, नारायण. आपल्या सूर्याजीपंत ठोसरांचा धाकटा पोर. औरंगाबाद जिल्ह्यातील आंबड तालुक्याच्या जांब गावचा बरे तो!

अगदीच मुलखावेगळा. दहा-अकरा वर्षाच्या वयात सव्वामणाची गोणी पाठीवर घेणार! प्रहर-प्रहर पाण्यात डुंबणार! थकायचा नाही की थंडीने कुडकुडायचा नाही!

दणकट शरीरात दणकट मन राहते. नारायणाचे मनही तसेच. एकदा स्वारी एकटीच अन् आपल्या तंद्रीतच बसली होती. तेव्हा त्याच्या आईला राणूबाईला कसेसेच वाटले. तिने विचारले, ''नारायणा, काय रे करतोस?''

''चिंता करतो विश्वाची!'' उत्तर आले.

बिचाऱ्या आईला ते उत्तर उमगेनाच. बाकी जणांना देखील तसेच व्हायचे. नारायणाचे सारेच काही विलक्षण होते. त्याची बुद्धी एकपाठी होती. त्याने 'अकरा धड्यात केले धुळाक्षर। अकरा प्रहरात वळले अक्षर। अकरा दिवसे केला जमाखर्च सुंदर।' असा होता नारायण. मनाने, मेंदूने, मनगटाने दणकट.

## २. अचपल मन माझे, नावरे आवरिता

नारायण ठोसर जन्माला आला रामनवमीला (शके १५३०), पण त्याचा चपळपणा होता मारुतीसारखा. नारायण पाच महिन्यांचा बसू लागला, सातव्या महिन्यात रांगू लागला. ''आऽलाऽबागुलबुवाऽऽ'' कोणी म्हटले, की हे बाळ म्हणायचे, ''थोकून काडीन!''

तो खेळही धट्ट्याकट्ट्या पोरांना घेऊन! गोट्या खेळणे, उड्या मारणे, झाडाझुडपात दड्या देणे, वडील हजार नमस्कार घालीत तर आपण दुप्पट घालणार म्हणून कामास लागणे यात त्याला काहीच वाटत नसे. एकदा आई राणूबाई म्हणाली, ''नारोबा, उद्या घरी आहे प्रयोजन! घरचे ताक काही पुरायचे नाही! पण तुला हे सांगून काय उपयोग?''

नारोबा काही बोलले नाहीत. त्यांनी कुंभारवाड्यात ठोकली धूम! अकरा डेरे तेथून घेतले. फिरले घरोघर. मागितले ताक अन घरात अकरा डेरे ताक आणून ठेवले परसदाराने!!

तांबड फुटायचे होते. आईने ते सारे पाहिले. विचारले, ''नारोबा, काय रे हे? माकडचेष्टा की काय?''

''अचपल मन माझे, नावरे आवरिता!'' उत्तर आले.

## ३. आम्हास आश्रम करणे नाही

ठोसरांचे कुलदैवत प्रभु रामचंद्र. सूर्याची उपासना घरात रोज चालावयाची. नारायणाचा थोरला भाऊ गंगाधर. तो उपासनेत तयार. मग नारायणाला तरी निराळे वळण कोठले?

त्यामुळेच ''उत्कट, भव्य, तितुके घ्यावे। मिळमिळित अवघे सांडावे।'' असे नारायणाला वाटे. अकराव्या वर्षी बदललाच की त्याचा सूर अन् पालटला त्याचा नूर. लोक विचारू लागले की, ''एवढा गंभीर का झालास रे? चिमुरडा पोर तू!''

नारायण उत्तर देई-''हृदयस्थ जागा नारायण। प्रेरणा केली।। माझ्या अंतकरणातला देव मला सांगतो आहे, गंभीर हो म्हणून.''

आता काय करावे याला?

राणूबाईंना वाटले, नारोबाच्यामागे 'आणा' लावावा; टाकावे याचे एकदा लग्न करून! हे आणा, ते आणा, असा संसाराचा लकडा सुरू झाला की येतील नारोबा ताळ्यावर.

आणि आईची वाटचाल तशी होऊ लागली. नारायणाला मुली सांगून येऊ लागल्या. कोठे काही जुळतेसे दिसले की आलेल्या पाहुण्यांना नारायण सांगे-"आम्हासि आश्रम करणे नाही।" मला लग्नच करायचे नाही.

आईला वाटले, पोरे असेच बोलतात. एकदा आईने नारायणाला एकटाच गाठला; विचारले, "रोज तू माझा असा का अपमान करतोस? काय म्हणत असतील येणारे पाहुणे मला?"

आईचा अपमान? ही कल्पनाच नारायणाला सहन होणारी नव्हती. मग सारी आळीमिळी गोपचिळी!!

## ४. आलेबले नवरदेव!

'न मातुः परदैवतम्।' आईपरते दैवत नाही. हे आपण शिकलो. आईचा अपमान, मग आपल्या हातून चुकून तरी का व्हावा? त्यातून आपला जन्म रामनवमीचा. राम आपल्या सावत्र आईचा मान राखी. तिच्या शब्दाकरता रामाने वनवास सोसला. अन माझ्या हातून आईचा अपमान? आपली मुंज झाली अन् दोन वर्षांत वडील गेले. सातव्या वर्षापासून आईनेच नाही का सांभाळले? आपला थोरला भाऊ सारा तीन वर्षांनी मोठा. सांभाळतो आहे ना सारे घर? यातल्या कुणाला दुखवायला, कोणी काय वाकडे केले आहे माझे?' नारायणाचे विचार असे वळण घेऊन बसले होते.

राणूबाईंच्या ते लक्षात आले. एक दिवशी ती आई नारायणाजवळ जाऊन बसली. म्हणाली, "नारायणा, माझे ऐक रे! तू लग्नाला तयार हो."

"ऊँ! हूँ!" नारायण ठाम उत्तरला.

"मग तू करणार तरी आहेस काय? चिंता वाहतो विश्वाची, असे सांगतोस. म्हणजे तरी काय रे?"

"बहुतजन सुखावे। हा कसा काळ फावे।। असे मला सारखे वाटते. त्यासाठी देव वश करून घ्यावा असे मनात येत असते."



3435 2E/8/cc

"हे काय पोरासोराचे काम? पण जे काय तुला करायचे असेल ते खुशाल कर, आईसारखे दैवत नाही, असे तू म्हणतोस, अन् माझा शब्द मोडतोस? माझ्याकरता तू लग्नाला उभा राहा." आईने आर्जव केले.

"बरे!" नारायणाने तिचे समाधान केले.

## ५. 'शुभ मंगल, सावधान!'

राणूबाईंनी पडत्या फळाची आज्ञा घेतली. लग्नाच्या बाबतीत आपण चकार शब्द काढायचा नाही, असे नारायणाने ठरविले. आईला वाटले, मुलगा निवळला. तिने आपल्या माहेरकडचीच सोयरिक ठरविली.

निःशेष काय ना रहित। तैसा तो विरूळा संत।

अवघ्या वेगळे संत। अक्षर ज्याचे।।

जांबेहून आसनगावास वऱ्हाडी आले. फाल्गुन वद्य अष्टमीचा गोरजमुहूर्त धरला होता. नारायणाने तोच धरला आपल्या परमेश्वरी साधनेसाठी घर सोडण्याचा मुहूर्त.

लग्नमंडपात एका पाटावर नारायण हाती नारळ घेऊन उभा राहिला. उपाध्यायांनी अंतरपाट धरला. त्यावरील स्वस्तिक चिन्हाकडे लक्ष पुरवावयास सांगितले. समोरच्या पाटावर वधूला उभी करून नेहमीच्या सरावाप्रमाणे 'शुभमंगलऽऽऽसावधान!' असे शब्द उच्चारले. मंडपातील बायका-पुरुष-मुले अक्षदा टाकण्याच्या धांदलीस लागली.

पण तेवढ्यात नवरदेवच कोठे होता जागेवर? 'शुभमंगल सावधान'चा अर्थ त्याच्या मनी चमकला. भलेच भले. कल्याणच कल्याण करू घ्यावेसे वाटत असेल आणि लोकांचेही करावयाचे असेल, तर आताच भानावर ये व नीट जाग घे.

मग काय? वारेवेगाने स्वारी जी गर्दीगडबडीतून गुंगारा मारून गेली ती एकदम गावाबाहेर! आजोळच होते आसनगाव. झाडे, पडिक जमिनी, बिगर वसती हे सर्व नारायणाच्या डोक्यात होतेच. एका ओसाडातील गर्द झाडाच्या फांदीवर नारायणाने दिली दडी!

इकडे लग्नमंडप गडबडला. जो तो व जी ती नारोबाचा शोध घेऊ

लागली! पण तो सापडतोय कुठला? 'समर्था फावली मध्यरात्री।'

लोकही 'धावले मध्यरात्री। परी कोणासी ना यशप्राप्ती।।' नारायण झाडावरून उतरला आणि नदी ओलांडून दक्षिण तीर गाठून बसला होता. 'देवाच्या सख्यत्वासाठी। जिवलगासी पडाव्या तुटी।।' एवढेच नव्हे, तर 'संकटी प्राणही वेचावा' लागला तरी तयारी हवी! ते साहस नारायण ठोसर याने करावयाचे ठरविले. वयाच्या बाराव्या वर्षी. तो गोदापार झाला आणि पंचवटी (नासिक)चे मार्गास लागला.

लग्नमंडपातून निसटलेला नारायण जांबेतून गोदावरीवर आला. तीन कोसांचे अंतर होते ते! लगेच प्रवाहात पडून पलीकडचा काठ त्याने गाठला. आणि पदयात्रा आरंभिली. एक नेसूचे धोतर व एक उपरणे जवळ. अंतःकरणात एकच आस होती :

**उदासीन हे वृत्ति जीवी धरावी।**
**अति आदरे सर्व सेवा करावी।।**
**सदा प्रीति लागो तुझे गूण गाता।**
**रघूनायका मागणे हेचि आता।।**


नारायण नाशकास आला. जवळ पूर्वेस टाकळी गाव. तेथे गोदावरी-नंदिनीचा संगम. शेजारची एक गुहा नारायणाने राहण्यासाठी पसंत केली. संगमावर उभे राहून तेरा कोटी, तेरा अक्षरी (श्री राम, जय राम जय जय राम) रामनामाचा जप करण्याचा बेत नारायणाने माघ शुद्ध ७ मि. शके १५४२ रोजी केला. जपयज्ञ हे ईश्वराचे रूप आहे असे गीतेत सांगितले नाही का?

पण लोकांना काय त्याचे? ते म्हणू लागले-'यासी काय झाले?। धडचि का बिघडले? वयेवीण लागले। देवपिसे।।१।। यासी कोणी मोहाचे वडीलधारे नाही। म्हणवुनी पाही छंद करी।।२।।'

पण अशा निंदेला का नारायण भीक घालणार होता? 'न निश्चय कधी ढळो। कुजनविघ्न बाधा टळो।।' ही दक्षता तो घेत होता.

# ६. रिकामा जाऊ ना दे क्षण!

पंचवटीत त्याला कोण ओळखणार? त्याने रामदर्शन केले. टाकळीस गेला. भल्या सकाळी आंघोळ करी; संध्या आटपे; गायत्री मंत्राचे पुरश्चरण आरंभी; दुसऱ्या प्रहरापासून 'श्रीराम जयराम, जय जयराम' या तेरा अक्षरी मंत्राचा जप करी। डोक्यावर सूर्य आला की पंचवटीला येऊन रामदर्शन घेई. मग माधुकरी मागे व भोजन घेई. 'पुढे भोजन झालियावरी। काही वाची, चर्चा करी।। एकान्ती जाऊनि विवरी। नाना ग्रंथ।।'



सायंकाळी कीर्तन-प्रवचन ऐकावयाचे, रात्री भजन-आरती या कार्यक्रमात भाग घ्यावयाचा, पुन्हा ग्रंथ चाळावयाचे व मनन करीत राहून झोप घ्यावयाची!

सतत बारा वर्षे नारायणाने असे वेळापत्रक सांभाळले. कशाकरिता? 'अभ्यासेचि प्रगट व्हावे'. म्हणूनच.

नारायणाला देवाची कृपा हवी होती. 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो

करील त्याचे। परंतु तेथे परमेश्वराचे। अधिष्ठान पाहिजे।।' ती रामकृपा नारायणाला मिळाली.

## ७. नारायण, 'रामदास' झाला

नारायण टाकळीस असता, एक दिवस त्याला दृष्टांत झाला. प्रभु रामचंद्रांनी स्वतः येऊन नारायणाला दीक्षा दिली. पंचवटीत व टाकळीत रामभक्ती करता करता, नारायणाचे जीवनच सगळ्या लोकांपेक्षा वेगळे झाले. उदात्त, उंची होत गेले ते! त्याचा अनुभव लोकांना येऊ लागला. नारायणही सांगू लागला-

**साह्य आम्हासी हनुमंत। आराध्य दैवत श्रीरघुनाथ।**
**गुरु श्रीराम समर्थ। काय उणे दासासी?।।१।।**
**दाता एक रघुनंदन। वरकड लंडी देईल कोण।?**
**ते सोडोनि आम्ही जन। कोणाप्रती मागावे?।।२।।**
**म्हणोनि आम्ही रामदास। रामचरणी आमुचा विश्वास।**
**कोसळोनि पडो रे आकाश। आणिकांची वास न पाहू।।३।।**

## ८. आतला आवाज

सन १६२३. टाकळीस येऊन नारायण ठोसर ऊर्फ रामदासाला तीन वर्षे झाली. एक दिवस संगमावर रोजच्यासारखा तो जप संपवून उभा होता. एवढ्यात एक बाई आली. तिने नमस्कार केला. रामदासाने आशीर्वाद दिला, "अष्टपुत्रा सोभाग्यवती भव!" (आठ मुलग्यांची भाग्यशाली आई हो.)

"या जन्मी का पुढील?" बाईचा प्रश्न आला.

रामदास चमकलाच. तो त्या बाईकडे पाहू लागला. तेव्हा बाईबरोबरीचा एक माणूस म्हणाला-"टाकळीच्या उत्तरेस दशपंचक हे गाव आहे. तिथले गिरिधर कुलकर्णी. क्षयाने आजारी होते. ते आज आटोपले. त्यांची ही बायको. अन्नपूर्णा. सती जाण्यापूर्वी साधूला नमस्कार करावा म्हणून आपल्याला

तिने नमस्कार केला. आपला आशीर्वाद...''

''झाला आहे, तो खराच ठरेल. राम बोलला आहे तो माझ्या तोंडाने.'' रामदासाने समजावले आणि गिरिधरचे शरीर जवळ आणण्यास सांगितले, तसे होताच रामाचे नाव घेऊन रामदासाने गोदावरीचे पाणी शिंपडले. तो गिरिधर झोपेतून चावळला जणू! 'राम। राम।' म्हणतच गिरिधर उठून बसला. गिरिधरने व सौ. अन्नपूर्णेने रामदासाला नमस्कार केला. तेव्हा रामदास म्हणाला, ''रामाच्या कृपेने तू दशपुत्रा'' होशील, तसे पुढे झालेही. गिरिधरचे आडनाव त्यामुळेच दशपुत्रे झाले. पहिला मुलगा होताच अन्नपूर्णाने तो रामदासास अर्पण केला. त्याचे नाव 'उद्धव.'

## ९. प्रभु देखिल, दास संतुष्ट झाला!



रामदासांचा तेरा कोटी जप सन १६३२ साली करून झाला, तेव्हा

सारा हिंदुस्थान डोळ्यांनी पाहावयाचा असे त्यांनी ठरविले. गिरिधर कुलकर्ण्यांचा मुलगा उद्धव याला ते कळले. तो रामदासांच्या अंगाखांद्यावर खेळलेला. त्यांचा कृतक मुलगाच. तो म्हणाला, ''महाराज, मला यात्रेला न्या.''

''कसा नेऊ तुला? बाळ, तू फार लहान आहेस रे! यात्रेची यातायात तुला सोसायची नाही. नुकतीच तुझी मुंज झाली आहे. तू येथेच रहा.''

उद्धव रामदासांच्या पायावर गडबळा लोळला. मग रामदासांनी त्याला कुरवाळले. ''मी यात्रा करून येईन तोवर या मारुतीची आराधना कर. तो तुला काही कमी पडू देणार नाही.'' अशी त्याची समजूत घातली. टाकळीला एक मारुती स्थापला. त्याच्याकडे पाहिल्यावर उद्धवाचे मन रमून गेले.

## १०. अधिकारेवीण सांगो नये

आपला अभ्यास पक्का करण्याकरिता, रामदास होण्यापूर्वीपासून नारायण आपली टिपणेटापणे ठेवी. पुष्कळ वेळा मूळ ग्रंथसुद्धा लिहून काढी. वाल्मिकी रामायण त्याने लिहून काढले होते. प्रत्येक कांडाच्या शेवटी 'रामेण रामदासेन लिखितम्' म्हणजे प्रभु रामचंद्रांनी ते रामदासाच्या हातून लिहिले असा उल्लेख आहे. मीपणाचा भागच नाही. 'अहंभाव ज्या मानसीचा विरेना। तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना।।' अहंभाव विरताविरताच नारायण उदात्त, उदासीन झाला आणि म्हणूनच रामदास मानला गेला. 'वृत्ति होईल उदासिन जेव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा।।''

वेद, वेदांत, उपनिषदे, भगवद्गीता व इतर अकरा गीता, भागवत्, रामायण, महाभारत, मनुस्मृती अशा सर्व ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास रामदासांचा झाला होता. त्यापासून शिकावयाचे ते रामदासाने हेरले होते. 'वाचिलेचि वाचावे पुनः पुन्हा।' हा त्याने नेम धरला. त्यानेच प्रबोध पक्का होतो. आपल्याला समजलेले लोकांना समजावून देण्याची हातोटीही रामदासाला साधली होती. कीर्तने, प्रवचने ही त्याची साधना होती. तिने रामदासाजवळ 'रोकडी प्रबोधशक्ति' आली.

स्वतःस जे समजले ते अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहण्याची सवय रामदासाने केली. 'उदंडाचे उदंड ऐकावे। परी ते प्रत्यय पहावे।' कारण

'प्रचीतीवीण जे बोलणे। ते अवघेचि कंटाळवाणे' होते.

अशा अभ्यासाने तयार झालेला रामदास मग तीर्थाटनाला निघाला. कारण 'कुग्रामे अथवा नगरे। पहावी घराची घरे। भिक्षामिसे लहान थोरे। परीक्षून सोडावी।।१।। बहुती काही तरी सापडे। विचक्षण लोकी मीत्री घडे।' असा त्याचा निश्चय झाला.

## ११. उत्तरेकडील यात्रा

'नित्य नूतन हिंडावे। उदंड देशाटन करावे।' म्हणून रामदासाने टाकळी (शके १५५४) सन १६३२ त सोडली. उत्तर दिशेकडे तोंड वळवले. 'उदंड बाजारी मिळाले। परी ते धूर्तेचि आळिले। धूर्तापाशी काही न चले। बाजाऱ्यांचे।।१।। याकारणे मुख्य मुख्य। तयासी करावे सख्य। येणेकरिता असंख्य। बाजारी मिळकती।।२।। धूर्तासी धूर्तचि आवडे। धूर्त धूर्तीच पवाडे। उगेचि हिंडती वेडे। कार्येवीण।।३।।' असे रामदासाचे निदर्शनास आले.

म्हणून 'भिकाऱ्यासारखे स्वरूपे' असले तरी 'उदंड करी गुप्तरूपे' हे धोरण आखून आपल्या कार्यासाठी 'लोकी मैत्री घडे' असे पाहिले. आपण रामदास असलो तरी 'दाटून उपदेश देऊ नये।' एवढेच नव्हे तर 'आपण आसक्त होऊ नये। केल्यावीण सांगो नये।।' हे पथ्य रामदासाने कटाक्षाने सांभाळले.

तरीही या साधूला अनेक शिष्य मिळाले. त्याचे अनेक मठ स्थापन झाले. काशीतील एका घाटावर या साधूने मारुती स्थापून त्यास 'हनुमान घाट' हे नाव दिले. पुढे त्याने अनेक ठिकाणी मारुती स्थापले.

त्यामुळे रामदासाला लोक 'रामदासस्वामी' म्हणू लागले. रामदास पुढे काश्मिरात गेले, त्यांनी हिमालयात प्रवास केला, अन् तेथून ते दक्षिणेकडे वळले. येताना वाटेत पंजाबमध्ये त्यांची व गुरुगोविंदसिंगांची गाठ पडली. गुरुगोविंदसिंगांनी तलवार बाळगली होती. ती स्वसंरक्षणार्थ आणि स्वधर्मरक्षणार्थही. तिचे रहस्य रामदासांनी समजून घेतले.

आपला धर्मसुद्धा तलवारीने फैलावणारांचे त्या वेळी हिंदुस्थानात राज्य होते. दुसऱ्या धर्माला ते सत्ताधारी धर्मच मानीत नव्हते. दुसऱ्या धर्माची

मंदिरे आणि मूर्ती ते तलवार बहाद्दर भ्रष्ट करीत. त्यांना तोंड देऊन स्वधर्म, स्वाभिमान आणि स्वसंस्कृती सांभाळण्यासाठी गुरुगोविंदसिंगांची समशेर होती.

रामदासांनी त्यापासून धडा घेतला. 'थोडाही गुण मिळता घ्यावा.' आतापर्यंत रामदास एकटेच धिटाईने प्रवास करीत होते. संरक्षणासाठी त्यांच्याजवळ तिरकमटा व गलोल एवढीच साधने असत. गुरुगोविंदसिंहांचे रहस्य उलगडल्यावर रामदासांनी आपल्या कुबडीत बारीकशा पात्याची दुधारी तलवार बाळगावयास सुरुवात केली. तिला 'गुप्ती' म्हणत व म्हणतात.

प्रवासात रामदास ठिकठिकाणच्या भाषा शिकले. 'अलौकिक होऊ नये लोकांप्रति।' यासाठी ते साधनच होते. करडा व कडक असा मोगली अंमल जेथे होता तेथे रामदास कधीकधी बंदे, फर्जंद, जिंदे, फकीर या नावांनीही हिंडले. हिंदीतून काव्ये करून आपला पेशाही त्यांनी लोकांना व राजकर्त्यांना पटविला, 'वेष असावा बावळा। परी अंतरी असाव्या नाना कळा।।' त्या अशा आणि असल्या.

हे सारे कशासाठी? सार्वजनिक दुःखे, संकटे, अडचणी, आक्रमणे सार्वजनिक संघटनेने दूर होतात. महाभारताचा तसा इशाराच आहे. 'न जानपादिकं दुःखमेकः शोचितुमर्हति।' यात्रेत हे रामदासांना पटले. तेव्हा त्यांनी आपला रामभक्तीचा सांप्रदाय म्हणजेच उदासीनपंथ फैलावण्यास सुरुवात केली. समुदायाचा हव्यास केला. 'अनन्य राहे समुदाय। इतर जनास उपजे भाव।' त्यासाठी 'लोकी लोक वाढविले। तेणे अमर्याद झाले। भूमंडळी सत्ता चाले। गुप्तरूपे।।'

मग साहजिकच 'महंते महंत करावे। युक्तिबुद्धीने भरावे। जाणते करोनि विखरावे। देशोदेशी।।' हे धोरण रामदासांनी अमलात आणले. विखरलेल्या महंताला उद्योग लावला की– 'संकेते लोक वेधावा। एकूण एक बोधावा। प्रपंचही सावरावा। यथानुशक्य।।१।। फड नासोचि नेदावा। पडिला प्रसंग सावरावा। अतिवाद न करावा। कोणी एकासी।।२।। दुःख दुसऱ्याचे जाणावे। ऐकून तरी वाटून घ्यावे। बरे-वाईट सोसावे। समुदायाचे।।३।। राजकारण बहुत करावे। परंतु कळोच नेदावे। परपीडेवरी नसावे। अंतःकरण।।४।।'

अशी कृतिपूजा करीत करीत रामदासांची यात्रा चालली होती. या तीर्थयात्रेत रामदासांनी (नारदकृत संकटनाशन स्तोत्रातील) बाराही गणेशांचे

दर्शन घेतले होते, (असे पुण्याच्या दामोदरशास्त्री दाते यांना एका संस्कृत चरित्रात आढळले आहे); मद्रासकडील कन्नानूरजवळील वक्रतुंड, कलकत्त्याजवळील एकदन्त, कन्याकुमारीजवळील कृष्णपिंगाक्ष, भुवनेश्वर (ओरिसा) येथील गजवक्त्र, ओंकारेश्वर, ज्योतिर्लिंगाजवळील (मध्यप्रदेश) पंचमुखी, हृषीकेशचा विकट, कुरुक्षेत्रातील विघ्नराजेंद्र, कालिकतजवळील धूम्रवर्ण, धनुष्कोटीचा भालचंद्र, काशीचा धुंडिराज, गोकर्ण-महाबळेश्वरचा द्विभुज मरुगणपती आणि हिमालयातील पांडुकेसरचा मंडकटा गणपती यांच्या पायापाशी रामदासांनी आपल्या लोकजागराच्या कार्यातील सर्व विघ्ने नाहीशी व्हावीत म्हणून विनम्र प्रार्थना केली होती की-

**'गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा।**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।।**
**नमो शारदा मूळ चत्वारि वाचा।**
**गमो पंथ आनंत या राघवाचा।।'**

## १२. दक्षिणेतील यात्रा

सहा वर्षे तरी रामदास उत्तरेत हिंडले. उघड्या डोळ्यांनी व कानांनी ते हिंडत होते. त्यांना अनुभव आला की 'एकादा आढळे गाजी। सकळ लोक अखंड राजी। सदासर्वदा आवडी ताजी। प्राणिमात्रांची।।१।। चुकोन उदंड आढळते। भारी मनुष्य दृष्टीस पडते। महंताचे लक्षणसे वाटते। अकस्मात।।२।। ऐसा आढळता लोक। चमत्कारे गुणग्राहिक। क्रिया, बोलणे नेमक। प्रत्ययाचे।।३।।'

हा अनुभव जमेस धरूनच रामदास दक्षिणयात्रेस उतरले. दक्षिणेतही त्यांना मठ स्थापले. वास्को द गामाच्या आगमनापासून देवमंदिरे फुटत होती. १५६० पासून या गोष्टीला ऊत आला होता. मिशनरी व मुल्ला हे उद्योग करीत होते. देवळांची चर्चे व मशिदी होत होत्या. तेव्हा 'मोडली देवळे मांडावी' म्हणून रामदास स्वामी लक्ष देऊ लागले.

हिमालय गंगेवरून बंगल्यातील गंगासागर, तेथून जगन्नाथपुरी, पुढे गोदावरीच्या मुखाजवळून पश्चिमेकडे ते वळले. मध्यप्रांत, वऱ्हाड, निजामी

राज्य पायाखाली घालीत घालीत रामदासांनी दक्षिण समुद्रापर्यंत पायपिटी केली. लंकाबेट पाहिले अन् ते परतले. मग मलबार, कारवार, म्हैसूर, कर्नाटक या प्रदेशांतून ते कोल्हापुरात आले, महालक्ष्मीचे दर्शन घेऊन रामदास, कृष्णा परिसरास संचार करू लागले. तो संपल्यावर आपली यात्रा पुरी करण्याकरिता रामदास टाकळीला गेले. पंचवटीत रामाचे दर्शन केले.

ज्या ज्या क्षेत्री समर्थ जात तेथे देवदर्शन घेत, काही दिवस राहत, लोकांची स्थिती समजावून घेत, लहानथोर परीक्षित आणि योग्य माणसाला दीक्षा देत, मठस्थापना करीत, मारुतीचे व रामाचे देऊळ बांधीत.

## १३. तीर्थयात्रा समाप्ती

रामदासांनी तीर्थयात्रा केली तीत दुष्काळाने, दुःशासनाने आणि दुर्दैवाने गांजलेला सगळा देश त्यांना आढळला. त्यामुळे आपले मठ स्थापून आणि लोकांस जागे करून 'बहुता जनाचे कसे सूख फावे।' हे ते पाहू लागले. ते प्रार्थना करू लागले की–

**कल्याण करी देवराया। जनहित विवरी।।**
**तळमळ तळमळ होतचि आहे। हे जन हाति धरी।।**

एवढेच नव्हे, तर ते स्वतःला आणि लोकांना उपदेश करू लागले की–

**उदासीन हे वृत्ति जीवी धरावी।**
**अती आदरे सर्व सेवा करावी।।**

खरोखर जनसेवा तीच ईश्वरसेवा हेच रामदास जनमनात ठसवू लागले.

**भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार।**
**त्याचे राखावे अंतर। या नाव भजन।।१।।**
**दुःख नेदावे कोणाला। उंच नीच जरी झाला।**
**अंतरात्मा ओळखिला। तोचि जाणावा सज्जन।।२।।**
**राजी राखावे सकळ। बरेपण सर्व काळ।**
**नित्य आनंदाची वेळ। काळ करी वंदन।।३।।**

या जनसेवेतून लोकांची संघटना साधायची असाही रामदासांनी निश्चय



पं. मं. ठाणे, बालवाङ्मय विभाग
क्र. 3535 दिनांक 20/4/88

केला. ते लोकांना सांगू लागले.

**मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा**
**ये विषयी न करिता तकवा। पूर्वज हासती।।१।।**
**मारिता मारिता मरावे। तेणे गतीस पावावे।**
**फिरोन येता पावावे। महद्‌भाग्य।।२।।**
**देशद्रोही तितुके कुत्रे। मारूनि घालावे पालथे।**
**देवदास पावती फत्ते। यदर्थी संदेह नाही।।३।।**

त्यासाठी प्रभुरामचंद्राचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवावा, असाही त्यांचा आग्रह सुरू झाला.

**भजाया जनी पाहता राम एकू।**
**करी बाण एकू मुखी शब्द एकू।।**
**कृती पाहता उद्धरी सर्व लोकू।**
**धरा जानकी नायकाचा विवेकू।।१।।**
**विचारूनि बोले, विवंचोनि चाले।**
**तयाचेनि संतप्त तेही निवाले।।**
**बरे शोधल्यावीण बोलू नको हो।**
**जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो।।२।।**

## १४. घार उडाली आकाशी

रामदास भारतभर हिंडले. पंचवटीस परत आले. रामदर्शन केले. तीर्थयात्रा पूर्ण करण्यासाठी गोदा-प्रदक्षिणेस निघाले. पैठणला आले.

रामदासांच्या जवळ तीरकमठा होता. एका ब्राह्मणाने चेष्टा चालवली "काय हो स्वामी, ही काय नुसती शोभा आहे की काही कला? असली कला तर ती पहा घार आकाशात उडती आहे."

रामदासांनी घार खाली पाडली. लागलीच ब्राह्मण उलट गोष्टी करू लागला. "तुम्ही साधू, डोक्यावर जटा, अंगावर हुर्मुजी वस्त्र अन् हिंसा करता? ब्राह्मण आहात का शिकारी? घार पाडलीत, प्रायश्चित्त नको का घ्यायला?"

रामदास म्हणाले, "द्या प्रायश्चित्त!" ब्राह्मणाने रामदासांना सक्षौर प्रायश्चित्त दिले. रामदास विचारतात "झालो का मी शुद्ध?"

"हो."

"मग घार कशी उठली नाही?"

"मेलेला प्राणी कसा उठेल! हिंसेला धर्माने प्रायश्चित्त सांगितले आहे, म्हणून आम्ही दिले."

"असा अर्धवट धर्म काय कामाचा? प्रायश्चित्त घेतल्यावर बिघडलेले सारे पहिल्यासारखे झाले पाहिजे" रामदास म्हणाले.

मग त्यांनी घार हाती घेतली. तिला कुरवाळले. 'राम तुझे कल्याण करो, जा बाई आपल्या वाटेने' असा घारीला त्यांनी आशीर्वाद दिला. अन् काय आश्चर्य! घार उडाली आकाशी!

## १५. तेचि भूत गे माय


रामदासांचे कीर्तन पैठणात होते. ऐकणारात आंबड प्रांतातला एक माणूस होता. त्याने रामदास म्हणजेच जांबचा नारायण ठोसर हे ओळखले, तसेच अनेकांनी.

कीर्तन संपले. 'गावचा जोशी पहात। जेणे ओळखिले असे म्हणला। हा नारायण सत्य आता। पुत्र सूर्याजीपंताचा।।' मग तो आंबडकर पुढे झाला. रामदासाला म्हणाला, "तुम्ही कीर्तन करीत फिरता. पण तुम्हाला आठवण आहे का आपल्या आईची?"

"जो अन्न देतो उदरासी। शरीर विकावे लागे त्यासी। मां जेणे घातले जन्मासी त्यासी कैसे विसरावे?" रामदासांचे उत्तर. "मग भेटा की तिला जाऊन जांबेस. नारायण भेटावा म्हणून बिचारी शोक करता करता आंधळी झाली आहे की!" "मी आईच्याच भेटीला निघालो आहे." आणि? खरोखरच रामदास जांबला गेले. मारुतीचे दर्शन घेतले त्यांनी. मग गेले घरी. अंगणातून पुकार केला–

'जय जय रघुवीर समर्थ.'

आईने म्हणजे राणूबाईंनी तो पुकार ऐकला. आपल्या सूनबाईस त्या



म्हणाल्या, "मुली, कोणी गोसावी आलाय वाटते, भिक्षा घाल."

पार्वतीबाई भिक्षा वाढायला अंगणात आल्या. रामदास म्हणाले, "वहिनी, ओळखले नाहीत मला? मी आईच्या अन् तुमच्या साऱ्यांच्या दर्शनाला आलो आहे. भिक्षेला नव्हे."

आता मात्र राणूबाईंनी नारायणाचा शब्द पक्का ओळखला. त्या म्हणाल्या, "कोण? माझा नारोबा का?"

इतक्यात रामदासांनी आईच्या पायावर डोईच ठेवली. राणूबाई मुलाला कडकडून भेटल्या, चोवीस वर्षांनी बाळ भेटल्याचा तो आनंद होता. राणूबाईंच्या डोळ्यांतून आसवे वाहत होती. नारायणाच्या सर्व अंगावर आईचा हात फिरला. रामदासांनी आईच्या डोळ्यांवरून हात फिरवला. राणूबाईंना दिसू लागले.

आई मुलाला म्हणाली, "परदेशी फिरून तू भूतचेष्टा शिकलास होय? कोणते भूत लागले रे तुला?" मुलगा सांगू लागला–

'होते वैकुंठीच्या कोनी। शिरले अयोध्याभुवनी। लागे कौसल्येचे स्तनी। तेचि भूत गे माय॥१॥ जाता कौशिक राउळी। अवलोकिता भयकाळी।

ताटिका ते छळोनी मेली। तेचि भूत गे माय।।२।। मार्गी जाता वनान्तरी। पाय पडता दगडावरी। पाषाणाची झाली नारी। तेचि भूत गे माय।।३।। जनकाचे अंगणि गेले। शिवाचे धनु भंगले। वैदेही-अंगी संचरले। तेचि भूत गे माय।।४।। जेणे सहस्त्रार्जुन वधिला। तोहि तात्काळचि भ्याला। धनु देउनि देह रक्षिला। तेचि भूत गे माय।।५।। पितयाचें हाकेशी। कैकयीचे वचनाशी। मानुनि गेले अरण्यांसी। तेचि भूत गे माय।।६।। चौदा संवत्सरे तपासी। अखंड हिंडे वनवासी। सांगाते भुजंग पोशी। तेचि भूत गे माय।।७।। सुग्रीवाचे पालन। वालीचे निर्दालन। तारी पाण्यावरि पाषाण। तेचि भूत गे माय।।८।। रक्षी मरणी बिभीषणा। मारी रावण-कुंभकर्णा। तोडी अमसंचे बंधन। तेचि भूत गे माय।।९।। वामांगी सीतेला धरले। धावुनि शरयूतीरा आले। तेथे भरताशी भेटले। तेचि भूत गे माय।।१०।। सर्वा भूतांचे हृदय। त्याचे नाव रामराम। रामदास नित्य गाय। तेचि भूत गे माय।।११।।'

इतक्यात देवघरात पूजा करणारे थोरले बंधू बाहेर आले. रामदासांनी त्यांना दंडवत घातले.

मग बोलणेच बोलणे झाले. लग्नमंडपातून पळाल्यापासून सारी तीर्थयात्रा रामदासांनी घरातल्यांना सांगितली.

पुढे मुक्कामात आईला कपिलगीताही रामदासांनी सांगितली. मग सर्वांची आज्ञा घेऊन गोदावरीच्या मुखाशी रामदास गेले. तेथून परतले ते त्र्यंबकेश्वर करून टाकळीस उद्धवाकडे आले.

## १६. राम हाती लागला

शके १५५४ (सन १६३२) मध्ये यात्रेस निघताना नाशिक भागात अवर्षण होते. त्यामुळे रामदासांनी नैसर्गिक दुष्काळ अनुभविणाऱ्या जनतेचे हाल पाहिले होते. यात्रेत परकीय सत्तेने मांडलेला उच्छेद त्यांच्या परिचयाचा झाला.

तेव्हा कृष्णातीर ही रामदासांनी आपली कर्मभूमी ठरविली. ज्या रियासती हिंदूना व त्यांच्या धर्माला छळतात, त्यांच्या परिसरातच आपण 'धर्मस्थापनेचे नर।।' उभे करायचे असे त्यांच्या मनाने घेतले. हा त्यांचा आतला आवाज

होता; श्रीरामाचा आदेश होता.

रामदास महाबळेश्वरास गेले. तेथे त्यांनी मारुतीची स्थापना केली. मारुती हा बजरंगबली, 'बुद्धिमतांवरिष्टं' आणि जगात काहीच अशक्य नाही असे मानणारा. प्रत्येक काम जीव घालून करणारा सेवायोगी. गावोगांव वेशीवर तो प्रताप-मारुती ठेवायचा. गावातील तरुणांनी तो आदर्श ठेवावा म्हणून.

महाबळेश्वराहून वाई. तेथून उंब्रज, मसूर, शहापूर हा परिसर रामदासांनी गाठला. 'राजा कालस्यकारणम्' विजापूरची आदिलशाही. ती कृष्णाकाठाला भोवतीच होती. तिचा इकडील मुख्य ठाण, कऱ्हाड. त्याच्या परिसरातच रामदास संचार करू लागले. सिंहाच्या गुहेतच त्याची आयाळ धरावी, असा हा धीटपणा होता. एके ठिकाणी स्नान, दुसरे ठिकाणी भिक्षा, तिसरीकडेच विश्रांती असा त्यांचा खाक्या होता. गुरुदेव दत्तासारखा!

## १७. महासंकटी साधु ये सोडवाया

रामदास सन १६४४ त प्रथम महाबळेश्वरास आले ते कृष्णातीरी, माणसांची मने नांगरण्यासाठी. तेथून ते वाई, माहुली, जरंडा, कराड मुक्काम ठोकत मसूरजवळच्या शहापूर येथील घळीत राहू लागले, कृष्णा-कोयनांच्या संगमावर आंघोळ आणि शहापूरला भिक्षा असा त्यांचा क्रम सुरू झाला.

'जय जय रघुवीर समर्थ' करीत रोजच्यासारखे रामदास, बाजीपंत कुलकर्ण्यांचे घरात शिरले. पाहतात तो बायकामंडळी कपाळाला हात लावून बसलेली! तेव्हा रामदासांनी चौकशी केली. बाजीपंतांची बायको सईबाई म्हणाली–

''काय सांगायचे कपाळ!! कऱ्हाडास आदिलशाही आहे ना? तिचे अधिकारी आले होते गावकीच्या हिशेबासाठी. यांना मुसक्या बांधून विजापूरला घेऊन गेले!!''

''रामनामाचा जप करा; अकराव्या दिवशी मालक घरी येतील'' रामदासांनी दिलासा दिला.

विजापूरच्या बादशहाकडे हिशोब भागला. बाजीपंत सुटले. परत येताना बाजीपंत म्हणाले– "हिशोब पुरा करताना तुम्ही बादशहांना दासोपंत असे नाव सांगितले, नव्हे का? पण माझ्या कशी ओळख लक्षात येत नाही?"

"आपले सासरे आबाजीपंत यांनी सईबाईच्या सांगण्यावरून मला धाडले" रामदासांनी खुलासा केला.

शहापूरच्या वेशीपर्यंत बरोबर आलेला दासोपंत डोंगरात सटकला. बाजीपंत गावदेवाचे दर्शन करीत होते. ते झाल्यावर घरी आले. "तुम्ही कोठला दासोपंत हिशोब चुकता करायला धाडला होता?" बाजीपंतांनी चौकशी केली?

सईबाईंच्या मेंदूने चमक मारली. रामदासांनी बोलणे केल्याचा तो अकरावाच दिवस होता. त्या म्हणाल्या, "होईल की उलगडा उद्याबिद्या!"

"नाही!" बाजीपंत म्हणाले. "दासोपंतांचे दर्शन झाल्याशिवाय मी अन्न घेणार नाही."

बाजीपंतांनी तीन दिवसांचा उपवास केला. चवथे दिवशी अंगणात 'जय, जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना झाली. सईबाई व बाजीपंत कृतज्ञतेने रामदासांच्या पायावर अश्रुसिंचन करू लागले. रामदासांनी त्यांना उठविले. दीक्षा दिली आणि डोंगराचा रस्ता धरला.

पुढे उभयतांची निष्ठा पाहून रामदासांनी त्यांच्यासाठी एक चुन्याचा प्रताप मारुती शहापुरास स्थापन केला. रामदासांच्या प्रसिद्ध मारुतींपैकी हा पहिला, १६४५ साली अवतरला.

## १८. रामाचा उत्सव सुरू

**'अंतरी कल्पना केली। एकान्ता बोलिले बहू।**
**रक्षिता देवदेवांचा। त्याचा उत्सव मांडिला।।'**

रामदासांनी प्रथम मसूरास सन १६४५ त. त्या पहिल्याच उत्सवात रस्त्यावरील सरकारी झाडाची एक फांदी आडवी येऊ लागली. रामाची पालखी जायची कशी?

तेव्हा शहाजीराजे भोसले हे मसूरचे देशमुख मसुरास काम करीत होते.

सरामदासांनी त्यांच्या कानावर उत्सवातील विघ्नाची अडचण गुपचूप घातली. दुसऱ्या दिवशी टाकली की ती सरकारी झाडाची फांदी तोडून! आदिलशाहीच्या देशमुखांचा मुक्काम मसूरास असताना, त्यांच्या देखत हा धीटपणा? लोकांना वाटले रामदासस्वामींनी रातोरात विजापुराहून परवाना आणला असावा, असा लोकतर्क झाला.

रामोत्सवाच्या तिसऱ्या वर्षी (१६४७) रामदास अंगापूरला गेले होते. तेथे कृष्णेच्या डोहात स्नान केले व रामनामाचा जप चालविला. इतक्यात एक अंगापूरकर म्हणाला, "कशाला त्या रामाचे नाव घेतोस बाबा? विजापूरकरांचे लोक देव-देवळे फोडताहेत पण एकाने तरी त्यांना हात दाखवायचा होता! आमचा राम झाला तरी दुसरे काय करणार? तो फुटू नये म्हणून गावकऱ्यांनी त्याला या डोहात लपवून ठेवलाय. तो का गोसावीबुवा तुला पावेल?"

रामदासांना मग कसे राहवणार? त्यांनी डोहात उडी व बुडी मारली, त्यांच्या हाताला राम तर लागलाच. पण त्याच्याबरोबर भवानीही.

केवढा आनंद झाला रामदासांना! त्या दोन्ही मूर्ती घेऊन त्यांनी उंब्रज व तेथून चरेगावचा डोंगर गाठला. डोंगरवाटेने ते चाफळखोरे गाठायच्या बेतात होते.

## १९. चाफळास राम



भोवती डोंगरांचा फेर. पायथ्याशी नदी. गलबल्यापासून दूर असे चाफळगाव. अरण्याने वेढलेले. डोंगरात घळीच घळी. तेव्हा आपल्या कार्याचे केंद्र चाफळच करावे असे रामदासांना वाटले. पण त्या मुख्य मठात

राम नको का?

पण अंगापूरचा राम हा गोसावी चाफळास कोण नेणार? अंगापुराहून राम हलविला हे कळताच तेथील गावकरी धावलेच होते रामदासापाठीमागे. चरेगावच्या रानात डोंगरावर सुखण्याच्या खिंडीत गाठले त्यांनी रामदासांना. "आमच्या कृष्णेच्या डोहात राम आहे, असे तुम्हाला कळले कसे?" अंगापूरकरांनी प्रश्न केला.

रामदास उत्तरले– "नित्यनेम माझा रामनाम जपण्याचा. तो अंगापूरला जपत असता, तो ऐकला रामांनी. अन् डोहातून म्हणतात कसे? 'मी येथे आहे, मी इथे आहे. अविंधांच्या भीतीने गावकऱ्यांनी मला इथे ठेवले आहे. तू जर माझा जप करतोस, तर माझी सरळ पूजा सुरू कर. असे हो जया अंतरी भाव जैसा। वसे हो तया अंतरी देव तैसा।। अनन्यासि रक्षीतसे चापपाणी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।। "ते पाहून घेऊ की आमचे आम्ही।" अंगापूरकर गरजले. "मग घेऊन जा की तुमचा देव! त्याची पूजा नीट व रोज नियमाने करा म्हणजे झाले?"

असे सांगून अंगापूरकरांपुढे मूर्ती ठेवून रामदास चाफळाला निघून गेले आणि मग?

अंगापूरकर लागले एकमेकांच्याकडे पाहायला. शंभराची शंभर तोंडे सुरू झाली. काही म्हणाले– "मूर्ती पुन्हा देवळात बसावायच्या तर अगोदरच डोहात का हलविल्या?" दुसरे कोणी म्हणाले– "झाले गेले गंगेला मिळाले, आता तरी देवळात ठेवून त्यांचे रक्षण होणार आहे का?" असेच काही नि तसेच काही बोल उमटू लागले. दिवसभर वादविवाद झाला. कोणाला मूर्ती उचलवेनाच! कारण संरक्षणाचा भरंवसा कोणाच्याच मनीमानसी नव्हता.

तेव्हा आणखी एक वाट निघाली. पोक्त माणसे म्हणाली– "रामाचे देऊळ बांधतो व उत्सव करतो, म्हणताहेत ना श्रीरामदासस्वामी? खुशाल करू दे की त्यांना ते. देवाची पूजा, रक्षण मग त्यांचे ते पाहतीलच की! पण अंगापूरकरांना त्या उत्सवात तरी कोणी विचारणार का?"

तशी मंडळी रामदासांकडे गेली. "तुम्हांला राम कोठे बसवायचा असेल तेथे बसवा. पण आम्हा अंगापूरकरांना थोडे तरी विचाराल की नाही?" असे रामदासांना ती मंडळी म्हणाली.

गुदगुल्या झाल्यासारखे रामदास हसले. म्हणाले, "अहो, रामाच्या

उत्सवात पाडव्या दिवशी पहिला मान छबिन्याची काठी धरण्याचा अंगापूरकरांना.''

मग सगळे सरळसूत झाले. रामदासांनी चरेगावच्या डोंगरातून भानजी गोसाव्याकडून मूर्ती चाफळास आणल्या. चाफळच्या दक्षिणेस मांडवी नदीपलीकडे, ओसाड जागा होती, ती गावकऱ्यांनी रामदासांना देऊ केली. तिच्यावर देऊळ बांधायचे रामदासांनी ठरविले रामाचे! रामनवमीचा उत्सव धूमधडाक्याने तेथेच करण्याचे कायम केले. 'सदासर्वदा प्रीति रामी धरावी।' म्हणून जनतेला विनंती केली.

## २०. लोकांच्या चालीने चालावे

अंगापूरच्या डोहातील राममूर्ती रामदासांना मिळाल्या, आता देऊळ बांधायचे कोठे? रामदासांना चाफळच्या आसपासचे डोंगर व वनश्री पसंत पडली. म्हणून ते गावकरी मंडळींकडे गेले. मांड नदीच्या कुंभार डोहापलीकडे दक्षिण दिशेस दाट झाडीत स्मशानभूमी होती. ती जागा गावकऱ्यांनी दाखवली.

रामदास म्हणाले, ''ठीक आहे.''

शिष्यमंडळी घेऊन ते जागा साफ करू लागले. शेंदूर व चुना लावलेले सर्व दगड त्यांनी डोहात दिले फेकून! मोठमोठ्या फत्तरांचा उपयोग देवळाच्या पायऱ्यासाठी व अन्य कामासाठी रामदासांनी केला. लोक म्हणाले, ''काय करता आहा हे महाराज? सगळी पिशाच्चे अन् म्हसोबा सगळ्या गावाला अन् येणार जाणाराला त्रास देतील ना?'' रामदास उत्तरले, ''त्याची नका करू काळजी. हा पाहा मी करतो बंदोबस्त!''

मग रामदासांची एका वेताळम्हसोबाच्या धोंड्याला टेकडीच्या खाली दक्षिणेस जांभळीच्या झाडाखाली ठेवून दिले आणि नियम घालून दिला की, रामाचा रथ उत्सवात ओढायचा असतो, त्याच्या आदले दिवशी एक मापटे तांदूळ व एक नारळ त्या म्हसोबास द्यायचा; तसेच रथाच्या दिवशी 'श्री'ची स्वारी परत आल्यावर श्रीवरून ओवाळलेला दहीभात म्हसोबाला द्यायचा. हेतू असा सांगितला की, 'सगळ्यांच्या दादालाच सांभाळले

म्हणजे त्याचे हाताखालचे दादागिरी करतीलच कसे?' हे झाले! पण देऊळ बांधण्यास पैसा कोठला! अहो साखरेचे खाणार त्याला देव देणार. पुण्यास शिवाजी महाराजांनी गिरीगोसाव्यांस कीर्तन ऐकल्यानंतर बिदागी देऊ केली. पण 'मोठे कीर्तन करू नये.' म्हणून गिरीगोसाव्यांनी ती नाकारली. तरीही महाराज आग्रह सोडीनात. तेव्हा गिरी गोसावी. म्हणाले, "चाफळास समर्थ रामदास श्रीरामाचे मंदिर बांधताहेत, त्याला मदत करावी."

तेव्हा चाफळचे मामलेदार नरसोपलनाथ अंबरखान यांचे मार्फत तीनशे होन शिवाजीमहाराजांकडून रामदासांकडे आले. मग चाफळचे आनंदराव देशपांडे आणि इतरही शिष्यमंडळींनी द्रव्य दिले आणि देवालय उभे राहिले, या देवालयात शके १५७० सर्वधारी नाम संवत्सरी श्रीरामनवमीचा उत्सव प्रथम मोठ्या समारंभाने झाला.

भोवती डोंगराचे फेर। मध्ये देवाचे शिखर। पुढे मंडप सुंदर। नव खणांचा।।१।। चहू खांबावरी रचना। वर त्या चोवीस कमाना। कमकटाऊ नयना। समाधान।।२।। नाना तरु आंबेवने। दोहींकडे वृंदावने। वृंदावनी जगज्जीवने। वस्ती केली।।३।। पुढे उभा कपी वीर। पूर्वेकडे लंबोदर। खाली दाटले तरुवर। ठायी ठायी।।४।। दमामे चौघडे वाजती। धडाके भांड्यांचे (तोफांचे) होती। फौजा भक्तांच्या साजती। ठायी ठायी।।५।। टाळ मृदंग उमांग। ब्रह्मविणे चुटक्या चंग। ताने याने माजे रंग। हरि कथेसी।।६।। उदंड यात्रेकरू आले। रंगी हरिदास मिळाले। श्रोते-वक्ते कथा चाले। भगवंताची।।७।। उदंड मनुष्याचे थाटे। दिसताती लखलखाटे। एकमेकासी बोभाटे। बोलविली खिरापतीची वाटणी। तेथे झालीसी दाटणी। पैसा नाही राजांगणी दाटी जाहली।।९।। रथ देवाचा ओढिला। यात्रेकरा निरोप झाला। पुढे जावयाचा गलबला। ठायी ठायी।।१०।। भक्तजन म्हणती देवा। आता लोभ असो द्यावा। धन्य सुकृताचा ठेवा। भक्ति तुझी।।११।। दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो। देव भक्तासवे जातो। ध्यानरूपे।।१२।।

असा हा रामाचा पहिला उत्सव झाला. जेणे फेडीला पांग ब्रह्मादिकांचा। बळे तोडिला बंध त्या त्रिदिशांचा।।१।। म्हणोनि कथा थोर या राघवाची। जनी ऐकता शांत होते भवाची।।२।। म्हणून रामदासांनी लोकांना रामोपासना दिली.



बाल वाङ्मय विभाग
दिनांक २४/४/८८
बा० वा०

# २१. मारुतीच्या प्रसादाने भुक्तिमुक्ती

'अंतरी कल्पना केली। एकांती बालले बहू।।' आणि रामदास नव्या उद्योगाला लागले.

सगळी जनता आपापले गुण ओळखून वागणारी, पण बळकट मनाची, मेंदूची व मनगटाची व्हावी तरच तिचे जीवन प्रभावी होते. प्रभावी जनता ध्येयासाठी सेवाभावी असावी. ती आपल्या ध्येयपुरुषासमोरच तेवढी हात जोडणारी पण इतरत्र स्वाभिमानाने ताठ राहणारी व्हावी. म्हणून रामदासांनी गावोगावच्या वेशीवर वज्रहनुमान मारुतीची म्हणजे प्रतापमारुतीची स्थापना करा, अशी प्रेरणा दिली. ती फलद्रूप झाली.

रामदासांचे ब्रीद होते 'आधी केले, मग सांगितले.' त्यास अनुसरून त्यांनी स्वतःच प्रथम शहापूर, मसूर, चाफळ, उंब्रज, शिराळे, मनपाडळे, पारगाव, माजगाव, शिंगणवाडी, बहे अशा आदिलशाहीच्या अंतरंगातील गावी अकरा मारुती स्थापले. चाफळास रामापुढे हात जोडून दास मारुती तर रामामागे जंबुमाळीस पायातळी घालणारा प्रतापमारुती आहे. हेच जनतेला व आपल्या शिष्यांना रामदासांचे ध्येयदर्शन होते. नदीच्या अवखळ पुरासारखा काळाचा लोट आला तरी त्याला दोनही हातांनी बाजूला सारीन, अशा हिय्याचा, बहे येथील कृष्णेच्या प्रवाहात असलेला मारुती जनतेला सोदाहरण धडा देतो. अशीच काही तरी शिकवण रामदासांचा प्रत्येक मारुती देत असतो.

जनतेकडून गाववेशीवर स्थापलेला प्रतापमारुती गावाचे संघटन दाखवतो. तो मारुती उफाड्या नजरेचा, उजवी चपराक उगारलेला, डाव्या हाती कमरेवर गदा घेतलेला आणि पायातळी जंबुमाळी घातलेलाच मारुती बहुधा असायचा, गावाचे वेशीत पाय टाकणारांनी समजून असावे की गावाकडे कोणी वाकड्या नजरेने पाहील तर खबरदार 'सत्राणे उड्डाणे' ही रामदासांनी केलेली आरती आणि त्यांची 'भीमरूपी स्तोत्र' मारुतीच्या उपासनेची मखखी समजावून देण्यास प्रभावीच ठरली. दैवताचे अवतार-कार्यानुरूप आचारउच्चार व विचार राखणे हीच खरी उपासना. भक्त करीत असतात तीच!

## 22. भिक्षामिषेण लहान थोरे परीक्षून सोडावे

कोल्हापुरास रामदास शके १५६८.त गेले. पाराजीपंत बरवे कुलकर्णी यांचे येथे मुक्काम होता. तीर्थप्रसादाची वेळ. पूजासाहित्य, पाट-रांगोळ्या एक दहा वर्षांचा मुलगा करीत होता. त्याचा चुणचुणीतपणा पाहून रामदासांना त्याची ओढच लागली. त्यांनी चौकशी केली. पाराजीपंतांनी माहिती दिली की,

"हा माझा भाचा. अंबाजी याचे नाव. हा, याचा भाऊ दत्ता आणि आई मीच सांभाळतो. कृष्णाजीपंत कुलकर्णी बाभूळगावकर हे या मुलांचे वडील. काशीस त्यांनी संन्यास घेतला. म्हणून ही मंडळी येथे आणली."

त्यावर रामदास म्हणाले, "अंबाजी आम्हास द्या. देता का?"

"मुलांची आई आहे. तिची सत्ता. मला काय अधिकार?" पाराजीपंत उत्तरले.

मग रामदासांनी तीच भिक्षा रखमाबाईस मागितली. ती माउली म्हणाली, "महाराज, अंबाजी नेता अन् आम्हा दोघांना टाकता? कल्याण करी देवराया।"

त्यावर रामदासांनी तिघांनाही जवळ केले. अंबाजी पुढे रामदासांचा पट्टशिष्यच झाला. त्याचे नावच 'कल्याण' ठेवले रामदासांनी. डोमगाव मठाचा तो (शके १६३७ अखेर) महंत होता. त्याचा भाऊ दत्तात्रय शिरगाव मठावर (शके १६३८ अखेर) होता. या दोनही शिष्यांनी लिहिलेले रामदासांचे 'दासबोध' प्रमाण मानतात.

## 23. प्रसंगे घडे तेचि मानूनि घ्यावे

शिवाजी प्रबळ होत चालला. आपले सरदार शहाजीराजे भोसले यांचा तो मुलगा! त्याने आपल्या राज्याला त्रास द्यावा म्हणजे काय? असा विजापूर दरबारचा संताप होता. काही केल्या शिवाजी आवरत नाही, असा विजापूरदरबारचा आढळ होता.

तेव्हा त्याने ठेवणीतला उपाय काढला. शिवाजीला शहाजीची फूस आहे, असा आरोप केला. आणि? सन १६४९ साली (शके १५७१) शहाजी राजांना अटक झाली! आपल्यामुळे आपल्या वडिलांवर विनाकारण

संकट ओढवले! हे पाहून शिवाजीचे राजकारण तटलेच! तेव्हा मोगलाईचा शह आदिलशाहीला देऊन शहाजीची सुटका शिवाजीने घडविली. पुढे कर्नाटकात जाताना, शिवाजीला, 'धामधूम करू नकोस' म्हणून शहाजींनी बजावले. शिवाजी उदास झाला!

१६५५ त (शके १५७७ च्या वैशाखात) रामदासांच्या झोळीत शिवाजींनी राज्यदानाची चिठ्ठी टाकली. रामदास मर्म समजले. त्यांनी शिवाजीराजांना 'सावधानतेचा रामप्रसाद' दिला की–

**'एकान्ती चाळणा करावी। धारणा उदंड धरावी।**
**नाना विचारणा करावी। अरिमित्रांची।।१।।**
**धुरेने धीर सोडू नये। मुख्य प्रसंग चुको नये।**
**उद्योगरहित राहो नये। पशु जैसा।।२।।**
**खबरदारी आणि वेगी। तेणे सामर्थ्य चढे अंगी।**
**नाना प्रसंगी कार्यभागी। अंतरचि न पडे।।३।।**
**जेथे बहुविचार। तेथे ईश्वर अवतार।**
**मागे जाले थोर थोर। धकेचपेटे सोसोनी।।४।।**
**पाहिलेचि पाहावे। केलेचि करावे।**
**शोधिलेचि शोधावे। राजकारण।।५।।**
**इशारतीचे बोलता नये। बोलायाचे लिहू नये।**
**लिहायाचे सांगू नये। जबाबीने।।६।।'**

शिवाजीनी आपल्या राजकारणाच्या धामधुमीची पुन्हा सुरुवात करावयाची आणि 'अमर्याद फितवेखोर। त्यांचा करावा संहार।' तर शहाजीराजांची अवज्ञा होता कामा नये. म्हणून शिवाजीमहाराजांना शहाजीराजांची संमती मिळवून देणे आवश्यक होते. त्याकरिता रामदास रामेश्वरयात्रेस निघाले. वाटेत तंजावर येथे शहाजीराजांकडे गेले. शहाजींच्या शब्दासाठी रामदासांनी व्यंकोजी राजांना अनुग्रह दिला. सुप्रसन्न शहाजीराजांची मग शिवाजीच्या राजकारणाला, रामदासांशी वाटाघाट झाल्यावर, संमती मिळाली.

रामदास पुढे रामेश्वराला गेले. इकडे शिवाजीमहाराजांनी आपले सरदार पाठवून फितवेखोर चंद्रराव मोऱ्यांचा काटा काढला. मग भावी राजधानीसाठी रायरी घेऊन आपली बाजू बळकट व निर्भय केली. शिवाजी कर्नाटकचे राजकारण साधण्यासाठी चालले. तोरगमल मुक्कामी त्यांची व रामेश्वराहून

परतलेल्या रामदासांची गाठ पडली. राजांचे क्षेमकुशल समजावून घेऊन रामदास शिवथर-महाबळेश्वरकडे रवाना झाले.

## २४. जनाचा प्रवाहो चालला म्हणजे बरे!

परकीय सत्तेच्या ऐन केंद्रात आपली धर्मपताका उभारायची, हा रामदासांचा शिरस्ताच होता. कोठेही मठ स्थापन करण्यास व राहण्यास त्यांना दिक्कत वाटत नसे. 'अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोग व्यवस्थिती.' हीच भारतीय संस्कृती ना?

शके १५७१ मध्ये (सन १६४९) रामदासांनी शिवथर घळीतच मुक्काम ठोकला. तेथे आपल्या उदासीन पंथाचा किंवा धारकरी सांप्रदायाचा प्रमाण ग्रंथ 'दासबोध' लिहायला रामदासांनी सुरुवात केली. संसार आणि परमार्थ सांगणारा तो ग्रंथ 'समर्थ कृपेची ही वचने' असे रामदासांनी म्हटले आहे.

माणूस म्हणते एक अन् परिस्थिती कर्तव्ये उभी करते भलतीच! (१६५२) शके १५७४ मध्ये रामदासांना जांब येथे जाऊन आईची व वडीलबंधूंची भेट घ्यावीच लागली. मराठवाड्यातही रामदास गेले. तेथून त्यांनी माहूर, मातापूर, सारंगपूर गाठले. इन्दूरबोधनास मारुतीची स्थापना झाली. मठही केला. बीड, नीळंबे ही गावे तरी मग मागे का राहतील? परिस्थितीने दासबोध पुरा व्हायला दहा वर्षांहून अधिकच वर्षे लागली!

'समर्थ कृपेची वचने। तो हा दासबोध।।' रामदास रामाला 'समर्थ' म्हणत पण दासबोध वाचल्यावर लोकच रामदासांना 'समर्थ' म्हणू लागले.

## २५. शिंगणवाडीस प्रसाद

प्रतापगडाहून १६४९ साली शिवाजीमहाराज चाफळखोऱ्यात आले. रामदासांनी बांधलेले राममंदिर त्यांनी पाहिले. नरसोमल अंबरखाने मामलेदारांच्या मार्फत गिरिगोसाव्यांच्या शिफारशीवरून आपण तीनशे होन दिलेले तेच हे राममंदिर याची खात्री करून घेतली.

त्याच वेळी महाराजांच्या लक्षात एक आले. देवालयास मांड नदी व हनुमंत ओढा यांचा उपद्रव होणार! त्याच्या निवारणार्थ बंधारा घालण्यासाठी महाराजांनी सातशे होन नरसोमल अंबरखान्याकडे सुपूर्द केले.

चाफळखोऱ्यात येऊनही रामदासांची भेट झाली नाही ही हुरहूर महाराजांना लागली तशीच रामदासांना. दोन स्वतंत्र प्रेरणा त्या. पण प्रीतिसंगमासाठी उत्सुक होत्या. तेव्हा शिवाजीमहाराज माहुलीकडे आहेत हे कळल्यावर रामदासांनी त्यांना पत्रच लिहिले.

**निश्चयाचा महामेरु। बहुत जनास आधारु।**
**अखंड स्थितीचा निर्धारु। श्रीमान योगी।।१।।**
**परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी।**
**जयाचे गुण महत्त्वासी। तुळणा कैची?।।२।।**
**धीर, उदार, सुंदर। शूर क्रियेसी तत्पर।**
**सावधपणेसी नृपवर। तुच्छ केले।।३।।**
**या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही।**
**महाराष्ट्र-धर्म राहिला काही। तुम्हा करिता।।४।।**
**कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकास धाक सुटले।**
**कित्येकास आश्रय झाले। शिवकल्याण-राजा।।५।।**
**तुमचे देशी वास्तव्य केले। परंतु वर्तमान नाही घेतले।**
**ऋणानुबंधे विस्मरण जाहले। बा काय नेणू।।६।।**
**उदंड राजकारण तटले। तेथे चित्त विभागले।**
**प्रसंग नसता लिहिले। क्षमा केली पाहिजे।।७।।**

मग महाराज दर्शनाची इच्छा धरून येत असल्याचे उत्तर रामदासांना आले. महाराज उत्तराच्या दुसऱ्या दिवशी माजगावेपर्यंत आले व तेथून निवडक मंडळींसह चाफळास रामदर्शन करण्यास आले.

रामदास शिंगणवाडीस आहेत असे सांगून दिवाकर गोसावी या रामदास शिष्याने महाराजांना तिकडे नेले. रामदास उंबराच्या झाडाखाली बसले होते. महाराजांनी नमस्कार केला. रामदास म्हणाले, "आताच आपले पत्र मिळाले. आपली भेट लागलीच झाली. आनंदी आनंद झाला."

महाराजांनी विनंती केली. "स्वामींचा अनुग्रह व्हावा."

रामदासांनी अनुग्रह केला. ते म्हणाले, "आपण क्षत्रिय आहां. पृथ्वी



म्लेंछमय झाली आहे. तिचे संकट निवारण आपल्या हातून व्हावे. अशी रघुपतीची इच्छा आहे. बहुता दिवसांचे हे बंड। म्लेंछ मातले उदंड। त्यांचे करोनि दुखंड। राज्य करावे।।''

महाराजांबरोबर निळो सोनदेव व बाळाजी आवजी होते. त्यांनाही रामदासांनी अनुग्रह केला व सेवायोग सांगितला.

महाराजांनी रामदासांना सोनेनाणी वाहिली. ती रामदासांनी उधळली व गुराखी मंडळीस घेण्यास सांगितली.

मग फिरून चाफळास रामदर्शन करून महाराज रायगडास परतले. तेथे आई जिजाईला रामदासांनी दिलेला प्रसाद दाखविला. प्रसादात नारळ, माती, खडे, लीद होती. महाराजांनी त्याचा अर्थ केला, नारळ माझ्या कल्याणार्थ. पृथ्वी प्राप्त होवो, अशासाठी माती दिली. किल्ले ताब्यात राहतील याचे आश्वासन खड्यात आहे व पागा पुष्कळ ताब्यात राहतील हे ही लीद सांगते.

## २६. प्रतापगडावरील प्रसंग

रामदास ठिकठिकाणी मठ घालून बसले. त्यांचा शिष्यसांप्रदाय वाढतच होता. त्यांच्या स्वतःच्या पायावर तर सुदर्शन चक्रच होते. ते आपल्या प्रवासात स्वराज्याच्या इमारतीचे साहित्य जमवीत होते. कोठे काय आहे, हे त्यांनी समजून घेतले होते. महाराष्ट्रातील राजकीय चळवळीची मुख्य मुख्य ठिकाणे, मुख्य मुख्य घराणी व त्यांचे बलाबल याविषयी पोक्त विचार ठरवून त्याबद्दलची माहिती ते शिवाजीस देत असावेत. ते जसे वेशाने तसेच पेशाने साधू होते ('मराठी रियासत' पूर्वार्ध पान १०४-१०५ आणि कॅ. मोडककृत 'प्रतापगडचे युद्ध' पाहा) हे करताना त्यांचे धोरण इतके कडक शिस्तीचे होते की, इशारतीचे बोलता नये। बोलायाचे लिहू नये। लिहायाचे सांगू नये। जबाबीने।। पोर्तुगीज रामदासाला रामजी म्हणून ओळखत आणि त्यांचे मठ व शिष्यगण हे शिवाजीचे गुप्त हेरखाते आहे असे समजत. याचा अनुभवही होता. तो असा : अफझुलखानाने विजापुरास पैजेचा विडा उचलला. 'शिवाजीला जिवंत तरी धरून आणीन किंवा त्याचे शिर तरी आणीन' अशी त्याची प्रतिज्ञा होती, पैजेचा विडा उचलून आणि आपल्या सर्व बायकांचा निकाल लावून खान १६५९ मध्ये आपल्या त्या मोहिमेवर निघाला. रामदासांचा पट्टशिष्य कल्याण याने शिवाजी महाराजांना इशारतीचे पत्र लिहिले :-

**विवेके करावे कार्यसाधन। जाणार नरतनू हे जाणून।**
**पुढील भविष्यार्थी मन। रहाटूच नये।।१।।**
**चालू नये असन्मार्गी। सत्यता बाणल्या अंगी।**
**रघुवीरकृपा ते प्रसंगी। दासमहात्म्य वाढवी।।२।।**
**रजनीनाथ आणि दिवाकर। नित्य नेमे करताती संचार।**
**घालताती येरझार। लाविले भ्रमण जगदीशे।।३।।**
**आदिमाया मूळ भवानी। हेचि जगताची स्वामिनी।**
**एकांती विवेचना करोनी। इष्ट योजना करावी।।४।।**

तुळजापूर-पंढरपूर नेस्तनाबूद करीत वाईचा तो सरसुभेदार रणमल्लासारखा घुमत चालला, १६५९ (शके १५८१) मध्ये त्याची प्रतापगडच्या पायथ्याशी दरबारी भेट घेण्याचे राजकारण शिवाजींनी आखले. तेव्हा रामदासांनी

सूचितपणे नमूद केले की 'वेशभूषण ते दूषण' असले तरी अशा आणीबाणीच्या प्रसंगी

**नाना वस्त्रे भूषणे। येणे शरीर शृंगारणे।**
**विवेके विचारे राजकारणे। अंतर शृंगारिजे।।१।।**

कारण ज्याच्याशी प्रसंग आहे तो असा आहे की–

**"तुंड, हेकाड, कठोर वचनी। अखंड तोले साभिमानी।**
**न्यायनीति अंतःकरणी। घेणार नाही।।१।।**
**तऱ्हे शीघ्रकोपी सदा। कदापि न धरी मर्यादा।**
**राजकारणाच्या संवादा। मिळोचि नेणे।।२।।"**

तेव्हा 'ऐसे लोंद बेइमानी। कदापि सत्य नाही वचनी। पापी अपस्मार जनी। राक्षस जाणावे।।' आणि अशा राक्षसाशी वागताना 'समयासारखा समय येना। नेम सहसा चालेना। नेम धरता राजकारणा। अंतर पडे।।' तरीही 'अति सर्वत्र वर्जावे। प्रसंग पाहोन चालावे। हटनिग्रही न पडावे। विवेकी पुरुषे।।१।। बहुताचि करिता हट। तेथे येऊन पडले तट। कोणी एकाचा शेवट। जाला पाहिजे।।२।।'

हे जर खरे, तर शिवाजीचा 'ईश्वर आहे साभिमानी। विशेष तुळजाभवानी। परंतु विचार पाहोनी। कार्य करणे।।१।। अखंडचि सावधाना। काय करावी सूचना? परंतु काही एक अनुमाना। आणिले पाहिजे।।२।। समर्थापाशी बहुत जन। राहिला पाहिजे साभिमान। निश्चळ करुनिया मन। लोक असती।।३।।'

शिवाजीमहाराजांनी आपल्या जीवाभावाचे लोक भोवताली सावध ठेवून अफझलखानाची भेट घेतली. अफझलच्या कपटाचा व त्याचा शेवट साधला. त्यानंतर राजे रामदासांच्या भेटीला आले. रामदासांनी राजे प्राणसंकटातून पार पडले म्हणून अभिनंदन करताना म्हटले–

**'सकळ कर्ता तो ईश्वरु। त्याने केला अंगीकारु।।'**

## २७. भवानीस प्रार्थना

मोरोपंत पिंगळ्यांना शिवाजीमहाराजांनी प्रतापगड किल्ला बांधण्यास सांगितले होते. ते संपल्यावर महाराजांनी तेथे प्रवेश केला. समारंभास रामदासांनाही आमंत्रण होते. प्रतापगडावर देवीची स्थापना शिवाजीमहाराजांनी

मोरोपंतांच्या पत्नीकडून करविली. या देवीला रामदासांनी प्रार्थना केली की, दैत्य संहारिले मागे, ऐसे उदंड ऐकतो। परंतु रोकडे काही शीघ्र आम्हासि दाखवी।। तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हाचि देखता.

## २८. शिष्यांचा अपराध गुरूला दंड!

रामदास निगडीहून सज्जनगडला येत होते. वाटेत देहेगावच्या रानात एका आंब्याखाली ते थोडा वेळ बसले. शिष्य मंडळींनी तेथल्या एका शेतातील कणसे काढून हुरडा भाजण्यास सुरुवात केली. शेताचा मालक धावत आला. हुरड्याची ताटे त्याने उचलली. आवतीभोवती पाहिले; झाडाखालचा हा बोवाच चोरीतला मुख्य असे शेतमालकाच्या डोक्याने घेतले. म्हणून समर्थांना त्याने झोडपले.

शिष्य काय कमी होते! ते शेतमालकावर तुटून पडू लागले. पण रामदास स्वामींनी त्यांना एकदम चूप बसविले. तेथून रामदास व शिष्य साताऱ्यास गेले. शिवाजीमहाराज तेथे होते. रामदासांच्या आंघोळीच्या वेळी त्यांच्या पाठीवरचे वळ शिवाजीमहाराजांना दिसले. त्यांनी चौकशी केली. शिष्यांकडून हकीगत कळली. शिवाजींनी शेतकऱ्यास बोलावून घेतले. शेतकऱ्याला शिवाजी काही बोलणार, तोच रामदास म्हणाले, "शिवबा, या शेतकऱ्यास शक्य तर शेला पागोटे द्या. अन् हे हुरड्याचे शेतही बक्षीस द्या. याचे आमचेवर अनंत उपकार आहेत. एरवी आमची सहनशीलता कशी कसास लागली असती?"

## २९. कल्याण-रेषा

काशीला विद्याभ्यास संपवून सदाशिवशास्त्री येवलेकर दिग्विजय करीत निघाले. दिवसा मशाली लावून व जानव्याला सुरी बांधून त्यांची स्वारी जायची. रामदास (शके १५८०) १६५८ मध्ये रामघळीत असता दिग्विजय करीत आलेले येवलेकर तेथे आले. रामदास एका दगडावर बसले होते. शेजारी कल्याण उभा होता. कल्याणाने येवलेकर शास्त्री आल्याची वर्दी

दिली. रामदासांनी शास्त्रीजींना नमस्कार केला.

"आपली व आमची बरोबरी झाली तर नमस्कार घेऊ, नाही तर आशीर्वाद देऊ–" सदाशिवशास्त्री.

"छे! छे! आपण भूदेव. आशीर्वादच द्यावा." रामदासांनी विनंती केली.

"परीक्षा झाल्यावाचून नमस्कार नाही नि आशीर्वाद नाही." शास्त्री.

"परीक्षा ती काय?" रामदासांनी विचारले.

"आमची वादभिक्षा आहे. आपणास जिंकल्यास जयपत्र घेऊ. जिंकलो गेल्यास मशाल विझवून जानव्याच्या सुरीने जीभ कापून घेऊन पुढे जाऊ."

"आम्ही रामाचे दास. आमच्याशी कसला वाद करता? बरोबरीच्या मंडळीशी सामना झालेला पुरुषार्थाचा. बहुरत्ना वसुंधरा." रामदासांनी विनयपूर्वक सुचविले.

"साधुपणाच्या गोष्टी नकोत? वाद करणार नसला तर जयपत्र द्या."

रामदास म्हणाले, "कल्याणा, तो महार चालला आहे ना तिकडे? त्याला जरा बोलाव बरे!" कल्याणाने तसे केले. रामदासांनी कल्याणाच्या हाती आपली कुबडी दिली व चार रेषा ओढण्यास सांगितल्या. कल्याणाने रेषा काढल्यावर रामदासांनी त्या महारास त्या रेषेच्या आत येण्यास सांगितले. तो आल्यावर रामदास म्हणाले, "हे सदाशिवशास्त्री येवलेकर. हे वाद करण्यास आले आहेत. यांना तोंड दे." मोळीविक्या महाराने सदाशिवशास्त्रींच्या प्रश्नास उत्तरे देऊन तीन वेळा त्यांचे तोंड बंद केले. तेव्हा शास्त्रींनी मशाल विझविली व सुरीने जीभ कापून घेण्यास सरसावले. पण "आतताईपणा करून विद्वत्तेला बट्टा लावू नका" असे सांगून कल्याणाकरवी रामदासांनी येवलेकरांच्या हातची सुरी काढून घेतली.

बहिरू महार रामदासांस म्हणाला, "हे महाराज? माझ्या तोंडून या शास्त्रीबुवांचा पाणउतारा का केला?" त्यावर येवलेकर म्हणाले,

"नाही रे बाबा! माझा पाणउतारा नाही. आम्ही पुस्तकी पंडित साधूने लोकजागार केला तर साधा माणूसही किती शहाणा होतो, याचा दाखला मला मिळाला." आणि मग, रामदासांना त्यांनी विचारले की, "बहिरूला कामगिरीबद्दल काहीच शाबासकी नाही का?"

"आहे तर!" रामदास म्हणाले, "मी ज्या धोंड्यावर बसलो होतो, तो

'बहिरू-धोंडा' म्हणून लोकतोंडी राहील, आणखीनही. रथोत्सवात श्रीची स्वारी दीपमाळेपर्यंत येते, त्या वेळी बहिरूस व पुढे त्याच्या वंशजास मानाचा नारळ मिळत राहील.''

बहिरूला हा प्रसाद झाला. मग सदाशिवशास्त्री येवलेकरांसही रामदासांनी अनुग्रह केला. नवे नाव वासुदेवपंडित ठेवले व कण्हेरीस मठ करून दिला.

आग्र्याला जाऊन औरंगजेबाच्या दरबारात त्याची भेट घेण्याला निघण्यापूर्वी समर्थांचाही सल्ला शिवाजीमहाराजांनी घेतला होता. (शिवाजी निबंधावली, भाग १ पाहा) परिणामतः शिवाजीमहाराज आग्र्याहून १६६६ त सुटल्यावर प्रथम मथुरेत आले. तेथे मोरोपंत पिंगळे यांचे तिघे मेहुणे होते त्यांचे घरी गेले. मथुरेहून बैरागी वेषाने महाराज रायगडास परत आले. त्या मार्गावरील समर्थांच्या मठातील महंताकडून सुखरूप वाट काढण्यास सहाय्य झाले. ( दि डिलिवरन्स बाय जी. के. देशपांडे पाहा,)

## ३०. उदंड करावे, परी गुप्तरूपे

औरंगजेबाच्या सगळ्या चौक्या, पहारे, टेहळण्या चुकवून त्यांना दक्षिणेत उतरायचे होते. एवढ्यात गर्जना ऐकू आली, 'जय जय रघुवीर समर्थ' मग राजांनी रामदासांच्या साधुमठात प्रवेश केला. त्या मठाचा महंत हरिकृष्ण. त्याचे मार्फत चिरजीव संभाजीच्या सुखरूपतेची व्यवस्था लागली आणि हरिकृष्णाने, अंतर्वेदीतील रामदासांचा मठपती हरिश्चंद्र याच्याकडे महाराजांच्या सुखरूपतेची जिम्मेदारी दिली. तोच प्रकार गुपचूपपणे पुढे सुरू झाला. अंतरवेदीतून अयोध्यामठाचे महंत रामकृष्ण, तेथून प्रयागमठाचे वेणीमाधव, पुढे काशीमठाचे रामचंद्र, देवदास व कृष्णाजी, तेथून तेलंगणातील शिवराम, बेदरचे श्रीराम, वऱ्हाडातील महारुद्र व बाळकृष्ण, ओढ्या पर्वतावरील बल्लाळ, घृष्णेश्वरचे आनंद, परळी जगन्नाथाचे मल्हारी, गोकर्णाचे भैरव, गोमान्तकमधील गोविंद या रामदासी महंतांच्या सहकाराने शिवाजीमहाराज कोल्हापूरमार्गे सातारा प्रांतात परत आले.

महाराजांचा हा प्रवास बिनबोभाट झाला. रामदासांचे यादव, माधव, चक्रपाणी, नारायण, विश्वनाथ असे रामदासी सर्वसंचारी होते. ते महाराजांच्या

प्रवासाची बातमी जिजाबाई मातोश्रींना व महाराजांच्या मंत्रिमंडळास देत. यामुळेच आषाढात अटक झालेले महाराज आग्र्यातून सटकले ते गोकुळअष्टमीच्या मथुरायात्रेतून पुढे निसटले नि मार्गशीर्ष महिन्यात राजगडी येऊन दाखल झाले. आपले महंतांनी महाराजांच्या मंत्रिमंडळाला निश्चिंत ठेवण्यात "राजकारण उदंड करावे। परी गुप्तरूपे।।" हा आपला इशारतीचा बोल सार्थ केला. हे रामदासांचे समाधान होते.

## ३१. गुरु-शिष्य प्रेम

शहापूर सातारा जिल्ह्यात मसूरपासून एक मैलावर (शके १५६७) सन १६४५ मध्ये आई सतीबाई बरोबरच त्यांचा मुलगा भीम याला अनुग्रह झाला. अनुग्रह झाल्यावर भीमस्वामी फार दिवस कृष्णातीरी रामदासांच्या जवळ होते. रामदास तंजावरास गेलेवर त्यांनी तेथे मठ स्थापला व त्यावर भीमस्वामींची योजना केली.

भीमस्वामींना समर्थांपासून दूर राहणे आवडले नाही. त्यांनी तंजावराहून पत्र लिहिले–

अखंडीत हे वासना भेटि व्हावी। प्रभूपायिची धूळ माथा पडावी। मनीचे मनी जाणसी स्वामिराया। किती वाढवू हा सविस्तार वाया।।१।।

रामदासांनी उत्तर लिहिले–

चित्रकला नाना नाटक। म्हणोनि नामे कर्नाटक। तेथे जे रामउपासक। पत्र त्यासी।।१।। तुम्ही पत्र पाठविले। वाचून आश्चर्य वाटले। परम समाधान झाले। देव जाणे।।२।। प्रवृत्तीसी पाहिजे राजकारण। निवृत्तीसी पाहिजे विवरण। जेथे अखंड श्रवणमनन। धन्य तो काळ।।३।। तुम्हासि प्रपंच आहे काही। आम्हासि ह्या वेगळे नाही। पत्र दर्शन सर्वही। साहणे होते।।४।।

## 32. चाफळ देवस्थानची सनद

सन १६७४ मध्ये शिवाजीराजांना राज्याभिषेक (शके १५९५ ज्येष्ठ शुद्ध १३ स) रायगडावर झाला. शके १६०० (सन १६७८) च्या

दसऱ्याला महाराजांनी रामदासांच्या चाफळ देवस्थानाला सनद दिली. ती संबंधीचे पत्र–

श्री

शके १६०० आश्विन शु॥ १०; श्रीरघुपति, श्रीमारुति, श्रीसद्‌गुरुवर्य श्रीसकलतीर्थरूप श्रीकैवल्यधाम श्रीमहाराज श्रीस्वामी– स्वामीचे सेवेसी, चरणरज शिवाजीराजे यांनी चरणावरी मस्तक ठेवून, विज्ञापना जे; मजवर कृपा करून सनाथ केले, आज्ञा केली की, 'तुमचा मुख्य धर्म राज्य साधन करून, धर्मस्थापना, देवब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पालन-रक्षण करावे, हे व्रत संपादून त्यात परमार्थ करावा. तुम्ही जे मनी धराल ते श्री सिद्धीस पाववील.'

त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करून राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशी स्थळे करावी, ऐसे जे जे मनी धरले ते ते स्वामींनी आशीर्वाद प्रतापे मनोरथ पूर्ण केले. याउपरी राज्य सर्व संपादिले ते चरणी अर्पण करून सर्व काळ सेवा घडावी, सेवा विचार मनी आणिला तेव्हा आज्ञा जाहली की, तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले तेच करावेत, तीच सेवा होय, ऐसे आज्ञापिले. यावरून निकट वास घडून वारंवार दर्शन घडावे, श्रीची स्थापना कोठेतरी होऊन सांप्रदाय शिष्य व भक्ति दिगंत विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली. तेही आसमंतात गिरिगव्हरी वास करून चाफळी श्रीची स्थापना करून सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली. त्यास चाफळी श्रींची पूजा मोहोच्छाव, ब्राह्मणभोजन, अतिथी, इमारत सर्व यथासांग घडावे; जेथे जेथे श्रींची मूर्तिस्थापना जाहली तेथे उच्छावे पूजा घडावी; यास राज्य संपादिले, यातील ग्रामभूमी कोठे, काय नेमावी, ते आज्ञा व्हावी. तेव्हा आज्ञा जाहली की, विशेष उपाधीचे कारण काय? तथापि आमचे मनी श्रींची सेवा घडावी हा निश्चय जाहला, त्यास यथावकाश जेथे जे नेमावेसे वाटेल ते नेमावे व पुढे जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसे करीत जावे. याप्रकारे आज्ञा जाहली. त्यास ग्रामभूमीची पत्रे करून पाठविली. श्रीसंनिध चाफळी एकशेएकवीस गाव सर्वमान्य व एकशेएकवीस गावी अकरा बिघेप्रमाणे भूमी व अकरा स्थळी श्रींची स्थापना जाहली, तेथे नैवेद्या-पूजेस अकरा बिघे प्रमाणे नेमिले आहे. ऐसा संकल्प केला आहे, तो सिद्धीस

जाण्याविषयी विनंती केली, तेव्हा संकल्प केला तो परंपरेने शेवटास पावावा ऐशी आज्ञा जाहली. त्यावरून गाऊ व भूमी नेमिले... एकूण दरोबस्त सर्वगाऊ तेहत्तीस व जमीनबिघे गाऊगन्ना चारशेएकोणीस व कुरण येक व गल्लाखंडी एकशेएकोणीस श्रीचे उच्छाहाबद्दल संकल्पातील सांप्रत नेमिले व उछाहाचे दिवसास व नक्की ऐवज धान्य समयाचे समयास प्रविष्ट करीन. अक्षई उछाहादि चालविण्याविषयी आज्ञा असावी. राज्याभिषेक शके ५ कालयुक्ताक्षी नाम संवत्सरे आश्विन शु।। १० दशमी. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

## 33. सामानगडावर

शिवाजी महाराजांनी समर्थ रामदासांना सामानगड दाखविला. रामदास म्हणाले–

'याही इमारतीकारणे। काय काय लागे करणे।' पाहा बरे. द्रव्य पारपत्य खबरदारी। सत्ता, सामर्थ्य, वेठबिगारी। गवंडी पाथरवट लोणारी। बेलदार कोळी।।१।। लोहार, सुतार, कुंभार,। कामगार लहान थोर। मांग, महार, चांभार। नाना याती।।२।। घन, कुदळी, संभळ। कुराळी पारा, गुटी गोल। टाक्या हातोडे लोळ। लोह पोलादाचे।।३।। गड, कोट, महाल, मठ्या। गुप्ताद्वारे अंतराकीड्या। छत्र्या लादण्याच्या तबकड्या। नाना भुयारी विवरे।।४।। धनधान्य-रस खाने। दारूखाने, जामदारखाने। नाना अठरा कारखाने। घुमट, मशीदी, मनोहरे।।५।। चित्रशाळा, नाटकशाळा। भोजनशाळा, होमशाळा। पाठशाळा, धर्मशाळा। नाना इमारती।।६।।

रामदासांना महाराष्ट्रराज्य हवे होते आणि त्याच्या सेवेत लहानथोर सर्वांना, अगदी परधर्मीयानाही, वाव देण्यावर त्यांचा भर होता.

## 34. श्रींची इच्छा

शके १६०२ (सन १६८०) चैत्र शुद्ध पौर्णिमेस छत्रपती शिवाजीमहाराजांनी इहलोक सोडला. ही बातमी जासूदामार्फत समर्थ रामदासांना

कळली. 'श्रींची इच्छा!' असे उद्गार निघाले. पण तेव्हापासून रामदासांनी अन्न सोडले; बाहेर फिरणेही बंद केले. संभाजीमहाराज रामचंद्र अमात्य यांसह जेष्ठ महिन्यात सज्जनगडावर येऊन भेटले. माघ शुद्ध सप्तमीच्या राज्याभिषेकास बोलावणे आले तेव्हा 'आपणांस येणे होत नाही' म्हणून समर्थांनी दिवाकर गोसावी यास पाठविले.

शके १६०३ च्या चैत्रातील राम-मारुती उत्सवास समर्थ रामदास चाफळीस आले. रामास म्हणाले, "या देहाकडून देवा, सेवा घेतलीत. पुढे जे आपली सेवा करतील त्यांचे कल्याण व्हावे. सांप्रदायाचा अभिमान श्रीस आहेच."

## ३५. संभाजीस पत्र

शिवाजी महाराज १६८० मध्ये चैत्र शु॥ १५ शके १६०२) परलोकी गेले! तेव्हापासून रामदास एकान्तप्रिय झाले; मातीचीच भांडी वापरू लागले; अगदी बेचैनच होते. त्यातून आणखी एक गडबड झाली. महाराजांचा थोरला मुलगा संभाजी. तो गादीवर यावयाचा.पण त्याला डावलून, धाकटा मुलगा राजाराम याला गादीवर बसविण्याचे कारस्थान सुरू झाले. त्याने संभाजी चिडला. त्याने आपल्या विरोधकांवर मात केली. गादी मिळवली. ती मिळवताना, विरोधकांना त्याने धुळीला मिळविले, नेस्तनाबूद केले आणि काहींस तर मरण दिले. संभाजीची ही उग्रता आवरणे वडीलधारा मनुष्य म्हणून आपले कर्तव्य आहे, असे रामदासांना वाटले. त्यांनी संभाजीला (शके १६०३ ) सरळ पत्र लिहिले की,

**अखंड सावधान असावे। दुश्चित्त कदापि नसावे।**
**तजवीजा करीत जावे। एकान्त स्थळी।।१।।**
**काही ऊग्र स्थिति सांडावी। काही सौम्यता धरावी।**
**चिंता लागावी परावी। अंतर्यामी।।२।।**
**मागील अपराध क्षमावे। कारभार हाती धरावे।**
**सुखी करून सोडावे। कामाकडे।।३।।**
**पाटवणी तुंब निघेना। तरी मग पाणी चालेना।**

तैसे सज्जनांच्या मना। कळले पाहिजे।।४।।
जनांचा प्रवाह चालला। म्हणजे कार्यभाग आटोपला।
जन ठायी ठायी तुंबला। म्हणजे खोटे।।५।।
श्रेष्ठी जे जे मेळविले। त्यासाठी भांडत बसले।
मग जाणावे फावले। गलिमासी।।६।।
ऐसे सहसा करू नये। दोघे भांडता तिसऱ्यासी जय।
धीर धरोन महत्कार्य। समजून करावे।।७।।
आधीच पडली धास्ती। म्हणजे कार्यभाग होय नास्ति।
या कारणे समस्ती। बुद्धि शोधावी।।८।।
राजी राखिता जग। मग कार्यभागाची लगबग।
ऐसे जाणोनिया सांग। समाधान राखावे।।९।।
सकळ लोक एक करावे। गलीम निवटून काढावे।
ऐसे करता कीर्ती धावे। दिगंतरी।।१०।।
आधी गाजवावे तडाके। मग भूमंडळ धाके।
ऐसे न होता धक्के। राज्यास होती।।११।।
समय, प्रसंग ओळखावा। राग निपटून काढावा।
आला तरी कळो न द्यावा। जनामध्ये।।१२।।
राज्यामध्ये सकळ लोक। सलगी देऊनि करावे सेवक।
लोकांचे मनामध्ये धाक। उपजोचि नये।।१३।।
बहुत लोक मिळवावे। एक विचारे भरावे।
कष्टे करोनी घसरावे। म्लेंछावरी।।१४।।
आहे तितुके जतन करावे। पुढे आणिक मिळवावे।
महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे।।१५।।
लोकी हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी। पावाल येणे।।१६।।
शिवरायास आठवावे। जीवित्व तृणवत् मानावे।
इहलोकी परलोकी राहावे। कीर्तिरूपे।।१७।।
शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी।।१८।।
शिवरायाचे कैसे चालणे। शिवरायाचे कैसे बोलणे।
शिवरायाची सलगी देणे। कैसे असे?।।१९।।

**सकळ सुखांचा त्याग। करुनि साधिजे तो योग।**
**राज्यसाधनाची लगबग। कैसी असे?।।२०।।**
**त्याहूनि करावे विशेष। तरीच म्हणावे पुरुष।**
**याउपरी आता विशेष। काय लिहावे?।।२१।।**

## ३६. अखेर

संभाजीराजे १६८१ साली (शके १६०३ च्या पौषात) भेटून गेले. रामदासांनी मग एक दिवस आपल्या जवळचे जे जे काही होते त्याची यादी केली. भांडीकुंडी, वस्त्रपात्र, काही म्हणता काहीच यादीवाचून ठेवले नाही. यादीच्या शेवटी शेरा मारला की या सगळ्या वस्तू देवाला अर्पण केल्या आहेत. शेवटी सांगितले की 'चाफळचे देऊळ उकलून बळकट करा. दीपमाला विशाळ करा.'

अशी निरवानिरव पाहिल्यावर शिष्य पडले काळजीत! तेव्हा रामदास म्हणाले, 'आत्माराम, दासबोध (हे माझे ग्रंथ)। माझे स्वरूप स्वतः सिद्ध। असता न करावा हो खेद। भक्त जनी।।'

इतक्यात तंजावराहून समर्थ रामदासांनी कारागिराला आपल्या मनाप्रमाणे घडवायला सांगितल्या होत्या, त्या आल्या धनुर्धारी राम-लक्ष्मण सीतेच्या मूर्ती. त्या रामदासांनी डोळे भरून पाहिल्या. पोटभर आनंद झाला त्यांना. मग त्यांनी त्या स्थापल्या सज्जन गडावर. आपल्या स्वतःच्या समाधीसाठी जागा आखून व राखून ठेवली होती, त्याच आवारात! आपल्या समाधीच्या माथ्यावर रामप्रभु विराजमान होतील अशा बेताने!

माघ वद्य पंचमीला हा सोहळा झाला आणि समर्थ रामदास आपला 'शेवटचा दिवस' गोड करण्याच्या मार्गाला लागले. ते कायावाचामनाने रामरूपी लीन झाले. अन्नपाणीच काय, ऐहिक जगाचे भानच ते विसरले.

माघ वद्य नवमी उगवली. रामदासांचे 'मन रामी रंगले' होते. तोंडाने रामनामाचा गजर चालला होता. शिष्यही साथ देऊ लागले. 'ब्रह्मानंदी लागली टाळी, कोण देहाते सांभाळी?' ऐन दोन प्रहरी रामदास रामस्वरूपी मिळून गेले.

## समर्थाची इच्छा

देवे दयाळे करुणा करावी। भक्ताभिमाने भरणी भरावी।
हे राम नौमी तरणी तरावी। दासा समस्ता वरणी वरावी।.१।।
रघुनाथदासा कल्याण व्हावे। अति सौख्य व्हावे, आनंदवावे.
उद्वेग नास्ते परशत्रु नास्ते। नाना विलासे मग तो विकासो।।२।।
कोडे नको रे कलहो नको रे। कापट्य-कर्मी सहसा नको रे।
निर्वाणचिंता निरसी अनंता। शरणांगता दे बहु धातमाता।।३।।
अजयो न हो रे, जयवंत हो रे। विपदा नको रे बहुभाग्य होरे।
श्रीमंत कारी जनहीत कारी। पर-ऊपकारी हरिदास तारी।।४।।
तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा। सदा स्वस्थ चिंतितसे गा महेंद्रा।
नृपाधीश देशा उरपूर्ण द्यावे। भवी दैन्य हे देशधाडी करावे।।५।।

शिष्या आक्का (देशपांडे) नी विचारले तेव्हा रामदास म्हणाले,
"आमुची प्रतिज्ञा ऐसी। काही न मागावे शिष्यासी।।
आपल्या मागे जगदीशासी। भजत जावे।।"



## श्री समर्थांचे ओझरते दर्शन

**अहंता नसे हो तया लेकुरासी।**
**म्हणोनी बहू आवडी रामदासी।।**

मी म्हणजे कुणी तरी अन् दुसरा काहीच नव्हे! असा ताठा नसतोच मुलांत! ती एकमेकांना पाहून फुलतात आणि एकमेकांत रमतात. त्यामुळे रामदासांना मुले फार आवडत. मुलांत मूल होऊन ते रमत.

रामदास म्हणजे नारायण सूर्याजी ठोसर. जांब गावचा. राणूबाईंना तो चैत्र शुद्ध ९, शके १५३० रोजी (१५ मार्च १६०८) झाला. त्याची मुंज पाचव्या वर्षीच झाली. तो संध्या, पूजा, वैश्वदेव घरीच शिकला. संस्कृत भाषाही घरीच येऊ लागली त्याला. लेखन, वाचन, हिशोबठिशोब तो शिकला गुरुजींकडे. पण हे सारे होत असता, बरोबरीची मुले घेऊन हा सूर्याला नमस्कार घालायचा, तालमीत जोर-बैठका-कुस्ती करायचा, नदीत डुंबायचा, झाडावर चढायचा, काय न् काय?

पण सन १६१५ त नारायणाचे वडील परलोकी गेले! थोरला भाऊ गंगाधर घर सांभाळू लागला. पण तोसुद्धा पंधरा वर्षांचा पोर! त्याला नारायणाने मदत करावी अशी आई राणूबाईंची इच्छा! छे! नारायणाचे घराकडे लक्षच नाही!!

तो आईला म्हणाला, 'चिंता करतो विश्वाची!' आई समजे– 'पोरे असेच म्हणायची! पण एकदा का बायकोची वेसण घातली की येतात नीट!!', तिने नारायणाची आर्जवे केली. तो बोहल्यावर उभा राहायला तयार झाला!! राहिलाही. पण 'शुभ मंगल सावधान!' असा आवाज झाला अन् नारायण सूंबाल्या करून गेला निघून!!!

नाशिकला गेली स्वारी. पंचवटीत राहिली. नासाडी नदी गोदावरीला मिळते टाकळी येथे. तेथे रोज आंघोळ करून नारायण रामाचा जप करी, पाण्यात उभे राहून! डोक्यावर सूर्य आला म्हणजे माधुकरी मागे. जेवण झाल्यावर काही वाचन चाले. मग पुराण, भजन चाले. हे सारे करताना नारायणाने समाजाचाही अभ्यास केला.

रामसेवेबरोबर नारायण आत्मनिरीक्षणही करी. 'मिथ्या शब्दज्ञाने। तुज अंतरलो। संदेही पडलो। मीपणाचे।।' ही नारायणाला जाणीव झाली. ते लोकांना पटले, तेव्हा लोक नारायण ठोसरला 'रामदास' म्हणू लागले. बारा वर्षे तपश्चर्या केल्यावर 'जेथे जावे तेथे राम समागमी। आता कासया मी खंत करू?' असा विश्वास आला. त्या विश्वासाने रामदास लोकांना शिकवू लागले 'आधी ते करावे कर्म, कर्ममार्गे उपासना! उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षचि पावणे।।'

रामदासांनी मग सारा हिंदुस्थान पायाखाली घातला, डोळ्यांनी बघितला आणि सन १६३२ ते १६४४ पर्यंत मिळालेल्या अनुभवाने काही करायचे मनात आणले. काशी, प्रयाग, गया, अयोध्या, गोकुळ, वृंदावन, मथुरा, हिमालय, चिपळूण, महाबळेश्वर, पंढरपूर, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, नाशिक, पंचवटी, पैठण, जांब अशी क्षेत्रे बारा वर्षे रामदास हिंडले. ईश्वर एक आहे, त्याचे चिंतन करणे आणि आपले कर्तव्य करीत राहणे, हा भक्तिमार्ग रामानुज, निंबार्क, मध्व, रामानंद, वल्लभाचार्य, चैतन्य, कबीर, नानक, नरसी मेहता, नामदेव, ज्ञानेश्वर– सगळ्या सगळ्या संत मंडळींनी भारताच्या निरनिराळ्या भागांत पसरविला होता, हे रामदासांना आढळले. त्याचबरोबर त्यांना हेही कळून चुकले की, उत्तरेपेक्षा दक्षिणेत प्रयत्न केला तर परसत्तेच्या विरुद्ध समाज लवकर एकवटेल. त्यासाठी त्यांनी 'उदंड समुदाय करावे' व 'युक्तिबुद्धीने भरावे' असे ठरविले आणि आपला 'प्रगट चालला उदास पंथ' सुरू केला.

हा उदास पंथ म्हणजेच धारकरी पंथ. त्याचे मठ त्यांनी तीर्थयात्रेत ठिकठिकाणी स्थापले होतेच. आता यादव, माधव, चक्रपाणी, नारायण, विश्वनाथ असे त्यांचेजवळ प्रचारक होते. आपणही मुलांना जमवून त्यांच्यात खेळण्यात, बोलण्यात, रमण्यात रामदास दिवस घालवीत. कृष्णाकाठी जोंधळा-मका दाणेदार होतात, तशीच माणसेही होतील, असा होरा रामदासांनी बांधला आणि जरंडा, वाई, महाबळेश्वर, मसूर, उंब्रज, कऱ्हाड, शिराळे, करवीर, मिरज येथे रामदासांनी मठ काढले! चाफळास मुख्य मठ उभा करून वर्षातून एकदा शिष्य मंडळी तेथे जमावीत आणि आपण वर्षभर केलेल्या कामाचा अहवाल त्यांनी तेथे सादर करावा, अशी शिस्त लावून दिली! चाफळाच्या मंदिरात राममूर्ती स्थापिली ती अंगापूर येथील श्रीकृष्णेच्या

डोहात रामदासांना सापडलेली होती.

रामदासांचा संप्रदाय वाढला. मग त्याचे ग्रंथ त्यांनी केले. दासबोध व आत्माराम हे मुख्य; मनाचे श्लोक, करुणाष्टके, सवाया; रामायणातील सुंदरकांड व बालकांड. प्रपंच करावा, पण परमार्थाने करावा आणि आपल्यापेक्षा समाजाचे सुख साधीत जावे, हा आहे मुख्य कटाक्ष समर्थसंप्रदायाचा. तो ठसविताना रामदासांनी 'आधी केले आणि मग सांगितले।' आहे आपल्या ग्रंथामधून. शरीरसंपन्नता, संघशक्ती, जयिष्णुता, उत्साह इत्यादी गुणांचा विकास हा पंथ साधी. रामदासस्वामींचे शिष्य उद्धव कल्याण, बाजी गोसावी, शिरवळकर, त्या पंथाचा प्रचार करीत. तो पंथ वाढला. इतका की गिरिधर स्वामी आपल्या समर्थप्रतापग्रंथात सांगतात की–

**'समर्थे अकारपूर्वक यवनासी मारविले।**
**मग चाफळ क्षेत्र उभे केले।**
**श्री तुळजा माउलीसी संस्थापिले।**
**जाउलीपर्वती प्रतापगडी।।१।।**
**रामचंद्र नीलकंठ, शिवराज-अमात्य।**
**अतिशय उछह करी नित्य नैमित्य।।**
**ज्यांचा वृंदावने लोक नित्य।**
**पराशर पर्वती पूजिताती।।२।।'**

–आणि मग? शिवाजीमहाराजांचे स्वराज्य झालेवर समर्थ रामदासस्वामीचा आनंद काय विचारावा? ते म्हणू लागले की–

**'उडाले सर्वही पापी। हिंदोस्तान बळावले**
**अभक्ताचा क्षयो झाला। आनंदवनभुवनी।।'**

तरी पण समर्थ रामदासस्वामींची सर्वकाळी उपयोगी पडणारी शिकवण अशी की–

**'केल्याने होत आहे रे। आधी केलेचि पाहिजे।**
**यत्न तो देव जाणावा। करिता श्लाघ्यता बहू।।'**

पुढे रामदास तंजावरात गेले. तिकडे मठ स्थापले, शिष्य केले; एका ओतार्‍याकडून रामाच्या मूर्ती त्यांनी करवून घेतल्या त्या रामदासांनी सज्जनगडावर स्थापिल्या, माघ व।। ५ मीस (शके १६०३). त्यानंतर चार दिवसांनी रामदासांनी समाधी घेतली!

# समर्थ रामदासांचा जीवन-पट

| शके | | |
|---|---|---|
| १५३० | चैत्र शु॥ ९ | नारायण सूर्याजी ठोसराचा (रामदासांचा) जन्म. |
| १५३५ | | नारायणाची मुंज. |
| १५३७ | मार्गशीर्ष शु॥ ९ | सूर्याजीपंत दिवंगत |
| १५४२ | | विवाह मंडपातून नारायण पळाला |
| १५५४ | माघ | १. रामदासस्वामी भारत-फिरतीस<br>२. शेवटची दोन वर्षे अवर्षण, मोगलस्वारीमुळे दुष्काळ. |
| १५५६ | | अयोध्या-मठावर बाबा वैष्णवदास |
| १५६६ | वैशाख | घडे वास कृष्णातिरी स्वामियास! |
| १५६९ | | अंगापूरच्या डोहात राममूर्तीची प्राप्ती |
| १५७० | चैत्र | पहिला रामोत्सव |
| १५७१ | | अकरा मारुतींची स्थापना पूर्ण |
| १५७२ | कार्तिक | (परळी) सज्जनगडावर |
| १५७५ | | मातापूर-सारंगपूरचा प्रवास |
| १५७७ | | माताजी राणूबाई परलोकी. |
| १५८० | | रामोत्सवास शिवाजीकडून १०० होन |
| १५८५ | | जेजुरीस |
| १६०० | अश्विन शु॥ १० | चाफळ देवस्थानास सनद |
| १६०३ | पौष | सज्जनगडी संभाजीस उपदेश |
| १६०३ | माघ व॥ ५ | सज्जनगडी राममूर्ती स्थापना |
| १६०३ | माघ व॥ ९ | सज्जनगडी समर्थांनी देह ठेवला. |

BVBK-0403538
बाल वाङ्मय विभाग
3435 28/8/88

**पु. पां. उर्फ बाबुराव गोखले**
**यांची बालवाङ्मय सेवा**

❖

गणपती बाप्पा

जय बजरंग

समर्थ रामदास

स्वामी रामतीर्थ

लो. टिळक

गोखल्यांच्या गोष्टी

भले भले साने गुरूजी!

बंडवाले नानासाहेब

❖

**समाजभूषण बाबुराव गोखले**
**स्मारक समिती**
२७३, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

३/६/३० ३९३७